प्रकरण चार
शिक्षण विभाग (परिच्छेद क्रमांक 4.106 ते 4.157)

4.106 जिल्हा परिषदेच्या शाळांची 30/09/2021 ची पटसंख्या निश्चिती व शिक्षकांचे समायोजन न केलेबाबत. पंचायत समिती जव्हार, जिल्हा पालघर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 17)

पंचायत समिती जव्हार, जिल्हा पालघर, यांनी सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांची 30 सप्टेंबर 2021 ची पटसंख्या निश्चिती व शिक्षकांचे समायोजन न केलेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जिपब-908/प्र.क्र.136/आस्था-4 दिनांक 06/10/2008 नुसार 30 सप्टेंबर रोजी सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांची पट निश्चिती करुन त्या अनुषंगाने शिक्षकांचे समायोजन करणे अनिवार्य आहे. विभागाने पटसंख्या निश्चितीस संचालकांची मान्यता घेतली नाही.

2. जिल्हा परिषद पालघर, पंचायत समिती जव्हार अंतर्गत कार्यान्वित असलेल्या एकूण 14 शाळामध्ये पदवीधर शिक्षकांची 8 पदे मंजूर असताना एकूण 22 शिक्षकांचा भरणा केला असून 14 शिक्षकांचे समायोजन करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

4.107 सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्तीच्या रकमा विद्यार्थी/पालक यांचे बँक खाती जमा न करता इतर खाती वर्ग करुन व स्व:ताचे नावे आहरीत केलेबाबत.

पंचायत समिती तलासरी, जिल्हा पालघर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 2)

पंचायत समिती तलासरी यांचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणावेळी जिल्हा परिषद शाळा सावरोली डोंगरीपाडा केंद्र वरवाडा यांचे कडील सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना, मानव विकास अनुदान, शालेय पोषण आहार, सादिल अनुदान इत्यादी साठी प्राप्त झालेल्या निधीच्या रकमा ज्या प्रयोजनासाठी देण्यात आल्या होत्या त्याच प्रयोजनासाठी खर्च केल्या किंवा कसे याची पडताळणी केली असता त्यात आढळून आलेल्या गंभीर अनियमिततांबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती, तलासरी यांना कळविण्यात आले आहे. लेखापरीक्षण कालावधी पर्यंत गट विकास अधिकारी यांचे अभिप्राय प्राप्त झाले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जिल्हा परिषद शाळा सावरोली डोंगरीपाडा केंद्र वरवाडा यांना सन 2020-21 व 2021-22 या वर्षासाठी शिष्यवृत्तीची रक्कम रुपये 8,90,500/- प्राप्त झाल्याचे दिसून येते.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविशि-2009/प्र.क्र.20/का.12 दिनांक 31/05/2010 मधील अनुक्रमांक 7 नुसार व शासन निर्णय क्रमांक शिष्यवृत्ती-2017/प्र.क्र.134/का.12 दिनांक 17/04/2018 मधील अनुक्रमांक 6 नुसार शिष्यवृत्तीची रक्कम त्वरित व वेळेत विद्यार्थी/पालक यांच्या आधार संलग्न बँक खाती अदा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक व प्रकल्प अधिकारी यांची असताना सन 2020-21 या वर्षासाठी प्राप्त झालेली शिष्यवृत्तीची रुपये 4,63,000/- व सन 2021-22 या वर्षाची शिष्यवृत्तीची रुपये 4,27,500/- एकूण रक्कम रुपये 8,90,500/- पैकी सन 2020-21 ची संपूर्ण रक्कम व सन 2021-22 या वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम रुपये 4,27,500/- पैकी रुपये 3,23,500/- नियमबाह्यपणे स्व:ताचे नावे व इतर खाती रक्कम वर्ग केली आहे.

2. सन 2022-23 या आर्थिक वर्षात नियमबाह्य पणे रक्कम रुपये 5,74,500/- रोखीने बँक खाती भरणा केली असून रक्कम रुपये 6,85,500/- विद्यार्थी/पालक यांचे खाती विलंबाने आदा केली आहे. उर्वरित रक्कम रुपये 2,05,000/- दिनांक 01/09/2022 पर्यंत आदा केल्याचे दिसून येत नाही.

यावरुन प्राप्त शिष्यवृत्तीच्या एकूण रक्कम रुपये 8,90,500/- पैकी इतर खाती वर्ग करुन विलंबाने आदा केलेल्या रुपये 6,85,500/- चा तात्पुरता अपहार व अद्यापपर्यंत आदा न केलेली रक्कम रुपये 2,05,000/- चा कायम अपहार केल्याचे दिसून येते. सन 2022-23 मधील जमा व खर्चाचा तपशील अपूर्ण लेख्याच्या अभावी नोंदविता आला नाही. तसेच सन 2022-23 या वर्षात विद्यार्थी/पालक यांचे खाती आदा केलेली रक्कम रुपये 6,85,500/- विद्यार्थी/पालक यांचेच खाती वर्ग केले बाबतचे आभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नाही त्यामुळे त्याची पडताळणी करता आली नाही.

3. सन 2021-22 मध्ये शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थी/पालक यांना अदा न केल्याच्या अनुषंगाने उपलब्ध अभिलेख्या मधील बँक पासबुक च्या नोंदीची पडताळणी केली असता यापूर्वीही वेळोवेळी प्राप्त झालेली शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थी / पालक यांचे खाती त्याच वेळी वर्ग केल्याचे दिसून येत नाही.

उदाहरणार्थ 1) बँक पासबुकवरील नोंदीनुसार दिनांक 07/09/2018 रोजी सन 2017-18 या वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम रुपये 2,53,000/- प्राप्त झाल्याचे दिसून येते व दिनांक 24/09/2018 रोजी धनादेश क्रमांक 059086 ने रक्कम रुपये 1,00,000/- भवानी इंटरप्रायजेस यांना आदा केली आहे.

2) दिनांक 12/03/2019 रोजी रुपये 1,95,300/- व दिनांक 03/05/2019 रोजी रुपये 83,700/- अशी एकूण रक्कम रुपये 2,79,000/- सन 2018-19 या वर्षाची शिष्यवृत्तीची प्राप्त झालेली रक्कम विद्यार्थी/पालक यांना अदा न करता दिनांक 18/03/2019 ते 29/03/2019 या कालावधीत रक्कम रुपये 2,22,500/- शाळा व्यवस्थापन समितीच्या खाती वर्ग केल्याचे दिसून येते व पुन्हा काही रक्कम रोखीने भरणा केल्याचे दिसून येते.

यावरुन संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदानाच्या रक्कमा ज्या प्रयोजनासाठी प्राप्त झाल्या त्याचा वापर त्याच प्रयोजनासाठी केल्याचे दिसून आले नाही.

4. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविशि-2009/प्र.क्र.20/का.12 दिनांक 31/05/2010 नुसार शैक्षणिक वर्ष 2010-11 पासून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थीच्या शैक्षणिक तसेच इतर किरकोळ खर्च भागविण्यासाठी अर्थ सहाय्य व्हावे या हेतूने शासनाने सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू केली होती तथापि शिष्यवृत्तीची रक्कम वेळच्या वेळी विद्यार्थी/पालक यांना आदा न केल्याने शासनाचा हेतू साध्य झाल्याचे दिसून येत नाही. मागील वर्षाच्या कालावधी मध्ये प्राप्त झालेले मानव विकास अनुदान, शालेय पोषण आहार इंधन बिल व मदतनीस मानधन अनुदान, 4 टक्के सादिल अनुदान इत्यादी प्राप्त अनुदानाच्या रक्कमा मोठ्या प्रमाणात स्व:ताचे नावे (self) बँकेतून काढल्याचे दिसून येते याबाबत विभागाने चौकशी करुन सदर रक्कमेचा अपहार झाले नसलेबाबत खात्री करणे तसेच सदर शिष्यवृत्तीच्या रक्कमा विद्यार्थी/पालक यांचे आधार संलग्न बँक खाती वर्ग झाल्याबाबत पूर्तता अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

4.108 प्राथमिक शाळांना अग्नीशामक यंत्रणा बसविणे.

पंचायत समिती उरण, जिल्हा रायगड, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 25)

पंचायत समिती उरण, जिल्हा रायगड यांनी वित्तीय वर्ष 2021-22 मध्ये प्राथमिक शाळांना अग्नीशामक यंत्रणा बसविणे या कामावर रुपये 3,99,613/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. करारनाम्यासाठी मुद्रांक पेपर BE346913 दिनांक 22/02/2022 रोजी मॅस्कॉट इलेक्ट्रॉनिक्स नावे खरेदी परंतू प्रत्यक्ष पुरवठादार जी टॅप सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (श्री. अभय अंकुश कडू) हे आहेत.

2. संबंधीत कामाचे कामवाटप, जिल्हा काम वाटप समिती यांचेकडून दिनांक 15/02/2022 रोजी केले आहे. कामवाटप झाल्यानंतर 8 दिवसाचे आत करारनामा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता दिनांक 21/03/2022 रोजी तद्संबंधी करारनामा केला आहे.

3. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2016/प्र.क्र.215/उद्योग-4 दिनांक 24 ऑगस्ट 2017 च्या शासन निर्णयानुसार गव्हर्मेंट ई-मार्केट प्लेस (GEM) वर खरेदी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नसल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ पंचायत समितीस झाला नाही.

4. संबंधित डिलीव्हरी (वितरण) चलन वर अग्नीशामक यंत्राचे स्पेशिफिकेशन नमुद नाही. तसेच अंगणवाडी शाळांना ज्या तारखेला सदर यंत्र पोहोच केले ती तारीख चलनावर नमुद नाही. त्यामुळे विहीत मुदतीत व योग्य स्पेशिफिकेशचे सदर यंत्र शाळेमध्ये बसवून कार्यान्वीत केल्याचे प्रमाणित करता येत नाही.

5. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी-2017/प्र.क्र.08/इमा-2 दिनांक 27/09/2018 नुसार 3 लाख ते 50 लाख पर्यंतच्या कामाची प्रसिद्धी जिल्हा स्तरावर मराठी वृत्तपत्रात व राज्य स्तरावर मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

6. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रासयो-2008/प्र.क्र.75/यो.9/ दिनांक 29-05-2008 मधील बाब क्रमांक 6 अन्वये जिल्हा परिषदेतील सर्व योजनेंतर्गत कामावरील चाचण्या जिल्हा प्रयोगशाळेमार्फत करुन घेणे बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता

1968 चे नियम 87 तसेच कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 3 नुसार साहित्याची गुणप्रत तपासणी करणे आवश्यक असताना अग्नीशामक यंत्राचे चाचणी अहवाल घेतले नाहीत.

7. महाराष्ट्र बांधकाम नियमावली 1984 मधील परिच्छेद क्रमांक 296 दोन(ब) नुसार माहे फेब्रुवारी/मार्च मध्ये कामाचा कार्यारंभ आदेश देऊ नये असे असतानाही दिनांक 28/03/2022 रोजी नियमबाह्यरित्या कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

8. शासन परिपत्रक क्रमांक पंविआ-2021/प्र.क्र.186/वित्त-4 दिनांक 23/11/2021 नुसार ठेकेदार यांनी कामाच्या ठिकाणी 90 सेंटीमीटर x 60 सेंटीमीटर मापाचा कामाची माहिती दर्शविणारा माहिती फलक लावणेची कार्यवाही केली नाही.

9. डीलीव्हरी (वितरण) चलन क्रमांक ME22011001 नुसार अग्नीशामक 3 यंत्रे संबंधी Delivery Adress समीर पाटील तालुका अलिबाग जिल्हा रायगड यांचे नावे आहे. सदर अग्नीशामक यंत्रे शाळांना पोहोच न करता समीर पाटील यांना देण्यात आली त्यामुळे सदर 3 यंत्राची प्रति यंत्र रक्कम रुपये 3,536/- प्रमाणे एकुण रक्कम रुपये 10,608/- संबंधीत जबाबदार व्यक्तीकडून वसूली करणे आवश्यक आहे.

10. पंचायत समिती उरण अधिनस्त 53 प्राथमिक शाळा मंजूर व कार्यान्वीत असताना तसेच संबंधीत प्राथमिक शाळांची मागणी नसताना 100 यंत्रे खरेदी केली आहेत. तद्संबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

4.109 पंचायत समिती देवगडकडील शिक्षण विभागातील वेतनातील अपहाराबाबत.

पंचायत समिती देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2007-08 ते 2017-18 (वि.ले.प.परिच्छेद क्रमांक 1)

पंचायत समिती देवगड सन 2007-08 ते सन 2017-18 या कालावधीचे विशेष लेखापरीक्षणामध्ये शिक्षण विभागाकडील शिक्षक, केंद्रप्रमुख, शिक्षण सेवक आणि मत्स्यव्यवसाय शिक्षक व कर्मचारी यांच्या मासिक वेतनासंबंधी अभिलेख्यांची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अपहार व अनियमितता आढळून आल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट 6 नुसार वेतन देयके तयार केली जातात व परिशिष्ट 7 नुसार शिक्षकांचे वेतन व भत्ते यांच्या प्रदानाची कार्यपद्धती विषद केलेली आहे. तसेच परिशिष्ट 4 मधील नियम 23 नुसार प्रदानाबाबतची कार्यवाही केली जाते. पंचायत समितीकडून सदर कार्यप्रद्धतीचा अवलंब न करता वेतन देयके प्रदान केली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पंचायत समिती देवगड शिक्षण विभागातील सन 2007-08 ते सन 2010-11 या वित्तीय वर्षात शिक्षक, केंद्रप्रमुख, शिक्षणसेवक व मत्स्यव्यवसाय शिक्षक व कर्मचारी यांचे मासिक वेतनाच्या एकीकरणात निव्वळ देय रकमामध्ये खालीलप्रमाणे जाणीवपूर्वक वाढ केलेली आहे. यामध्ये सन 2007-08 व सन 2009-10 या आर्थिक वर्षाच्या बँक याद्या व तालुका मास्तर कडील अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेने अपहारीत रकमेचा शोध घेता आला नाही.

सन 2008-09 व सन 2010-11 या आर्थिक वर्षात मुळ परिच्छेदातील तक्त्यानुसार तफावतीच्या अनुक्रमे रुपये 39,728/- व रुपये 1,99,478/- अशी एकूण रक्कम रुपये 2,39,206/- वाढीव रक्कम नियमबाह्यपणे मुळ परिच्छेदात नमूद केलेप्रमाणे 3 शिक्षक/कर्मचारी यांच्या बँक खाती वर्ग करुन मोठ्या प्रमाणात शासकीय निधीचा अपहार केला आहे. उपरोक्त नमूद दोन रकमांमध्ये तपास न लागलेली एकूण रक्कम रुपये 37,897/- चा समावेश आहे.

2. माहे एप्रिल, 2011 पासून गट विकास अधिकारी यांचे स्वाक्षरीत धनादेश शिक्षण विभागाकडे बँक नामे देण्यात येत होते. सदर धनादेश संबंधित शिक्षकांच्या बँक खाती वेतन जमा करण्यासाठी शिक्षकांचे नाव, बँक खाते क्रमांक व रक्कम नमूद असलेली बँक यादी गट शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरीने बँकेकडे पाठविण्यात येत होती. मात्र सन 2011-12 ते सन 2015-16 या वित्तीय वर्षात मुळ परिच्छेदात नमूद तपशीलाप्रमाणे शिक्षक, केंद्रप्रमुख, शिक्षणसेवक व मत्स्यव्यवसाय शिक्षक व कर्मचारी यांचे मासिक वेतनाच्या एकीकरणात निव्वळ देय रकमामध्ये वर्षानुक्रमे रुपये 13,03,451/-, रुपये 17,82,013/-, रुपये 53,12,982/-, रुपये 85,60,838/- व रुपये 32,93,960/- अशी एकूण रक्कम रुपये 2,05,53,244/- जाणीवपूर्वक वाढ करुन वेतनाच्या मासिक एकीकरणात नमूद नसलेली शिक्षक व कर्मचारी यांची नावे बँकेस सादर केलेल्या बँक

यादीमध्ये समाविष्ट करुन मुळ परिच्छेदातील नमूद तपशीलाप्रमाणे एकूण 18 व्यक्तींच्या नावे वाढीव रकमा वर्ग केल्या आहेत. उपरोक्त नमूद रकमेमध्ये तपास न लागलेली एकूण रक्कम रुपये 61,139/- चा समावेश आहे.

वरील अतिप्रदान रकमांमध्ये माहे जुलै 2011, ऑगस्ट 2011, ऑक्टोबर 2011, नोव्हेंबर 2011, व फेब्रुवारी 2012 या महिन्यांचे वेतनाचे मासिक एकीकरण तक्ते अप्राप्त असल्याने अतिप्रदान रक्कम जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडील चौकशी अहवालासोबत जोडलेल्या वैयक्तिक बँक विवरणपत्रानुसार (Bank Statement) घेण्यात आली आहे. तसेच माहे ऑगस्ट 2015 चे वेतन तक्ते अप्राप्त असल्याने अपहारित रक्कम रुपये 5,70,173/- जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचेकडील चौकशी अहवालासोबत जोडलेल्या संबंधितांच्या वैयक्तिक बँक विवरणपत्रानुसार घेण्यात आली आहे.

3. पंचायत समितीच्या लेखा शाखेत तपासणी, प्रदान व धनादेश देणे इत्यादीसाठी सादर केलेल्या वेतन देयकांची वरिष्ठ सहाय्यक छाननी करतील व प्रदानार्थ शेरा नमूद करुन कनिष्ठ लेखाधिकारी यांचेकडे छाननीसाठी सादर करतील मात्र वरिष्ठ सहाय्यक व कनिष्ठ लेखाधिकारी यांनी याप्रमाणे छाननी केलेली नाही.

सहाय्यक लेखाधिकारी यांनी वेतन देयकाची छाननी करून स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. आहरण व संवितरण अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी यांनी देयकाची छाननी करून देयक मंजूर करणे व धनादेशावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे सहाय्यक लेखाधिकारी व गट विकास अधिकारी यांनी देयकाची छाननी केलेली नाही.

4. गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीनंतर सदर देयकांची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मध्ये नमूद रोजकीर्द नमुना नंबर 7 मध्ये देयक तपशिल, प्रमाणक क्रमांक, धनादेश क्रमांक, दिनांक, रक्कम व स्वाक्षरीसह नोंद घेणे आवश्यक आहे मात्र प्रत्यक्षात नमुना नंबर 7 ला पेनाने न नोंदविता छापील पृष्ठे चिकटवलेली आहेत.

5. शिक्षण विभागाकडील कनिष्ठ सहाय्यक यांनी शिक्षक, केंद्रप्रमुख, शिक्षणसेवक व मत्स्यव्यवसाय शिक्षक व कर्मचारी यांचे मासिक वेतनाच्या एकीकरणात स्थूल व निव्वळ देय रकमामध्ये जाणीवपूर्वक वाढ करून सदर वाढीव रकमा नियमबाहयपणे स्वतःच्या तसेच इतर काही शिक्षक व कर्मचारी यांच्या बँक खाती वर्ग करून मोठ्या प्रमाणात शासकीय निधीचा अपहार केला आहे.

6. गट विकास अधिकारी (उच्चस्तर वर्ग-1) पंचायत समिती देवगड यांचेकडील पत्र क्र. पंसद/शिक्षण/वस-१/अ.व.प.641/2024 दिनांक 27/09/2024 नुसार एकूण 11 शिक्षक/कर्मचारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचेकडून संबंधिताना दिलेल्या नोटिसीत नमूद केलेनुसार मुळ परिच्छेदात नमूद तपशीलाप्रमाणे व्याजासह एकूण रक्कम रुपये 28,50,803/- गट विकास अधिकारी पंचायत समिती देवगड यांचे बँक खाती जमा केली आहे.

सद्यस्थितीत सदर रकमा गट विकास अधिकारी यांचे बँक खाती जमा असून गट विकास अधिकारी, पंचायत समिती देवगड यांनी सदर रकमा शासन खाती भरणा केलेल्या नाहीत.

सबब शिक्षण विभागातील व लेखा शाखेतील कार्यासन सांभाळणारे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम क्रमांक 3 व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक शिस्त व अपील) 1979, नियम क्रमांक 3 चे उल्लंघन केले आहे. तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम क्रमांक 53 परिशिष्ट 20 अन्वये कारवाईस पात्र ठरत आहे. सदर अपहारीत रक्कमा संबंधितांकडून विहित शासन नियमानुसार दंडनीय व्याजासह वसूल करून त्वरित शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

4.110 जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांकडील शालेय पोषण आहार रोख वहयांतील अनियमिततांबाबत. पंचायत समिती येवला, जिल्हा नाशिक सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 41)

पंचायत समिती येवला सन 2021-2022 चे लेखा परीक्षणात जिल्हा परिषद शाळांकडील शालेय पोषण आहाराच्या रोख वहयांची तपासणी केली असता विविध अनियमितता आढळून आल्यात. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. रोखवही/किर्दीमध्ये काही ठिकाणी खाडाखोड करुन व्हाईटींगचा वापर करण्यात आलेला आहे.

2. रोखवहीवर मुख्याध्यापक/अथवा संबंधित यांचे सही व शिक्के नाहीत. रोखवहीच्या शेवटच्या पृष्ठावर एकूण पृष्ठांबाबत प्रमाणपत्र नोंदविलेले नाही. रोखवहीत प्रमाणकांसाठी प्रमाणक क्रमांक लिहीलेले नाहीत.

3. काही शाळांकडील रोखवहयांमध्ये सुरवातीची शिल्लक, अखेरची शिल्लक नमूद केली जात नाही, केवळ दैनंदीन जमा किंवा खर्च रकमेची नोंद केली असल्याचे आढळून आले.

4. शाळांकडील एन.डी.सी.सी. बँकेतील खात्याची शिल्लक रोखवहीला घेतली नसल्यामुळे आर्थिक अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उदाहरणादाखल 10 शाळेमधील रोख नोंदवही मधील त्रुटी नमूद केल्या आहेत.

4.111 शिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतनाबाबत अनियमितता.

पंचायत समिती इगतपुरी, जिल्हा नाशिक सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 28)

पंचायत समिती इगतपूरी लेखापरीक्षणात शिक्षण विभागाचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात प्रदान केलेल्या निवृत्ती वेतन खर्चाची पडताळणी केली असता निवृत्ती वेतनाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शिक्षण विभागाचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात प्रदान केलेल्या निवृत्ती वेतन खर्चाची पडताळणी केली असता निवृत्तीवेतन धारकांना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत दराने निवृत्तीवेतन प्रदान करण्यात येत आहे. तथापि ए.पी.पी.-9 व ए.पी.पी.-10 नोंदवहीतील नोंदी परिपूर्ण नाहीत. तसेच ए.पी.पी.-9 नोंदवहीत मध्ये 11 निवृत्ती वेतन धारकाचे पीपीओ क्रमांक नमुद नाहीत व लेखा परीक्षणास उपलब्ध नाहीत तरी सदर कर्मचा-यांना निवृत्ती वेतन नियमीत प्रदान केले जात आहे.

2. पी.पी.ओ. मध्ये 7 व्या वेतन आयोगानुसार देय फरकाच्या हप्त्यांची नोंद केलेली नाही. तसेच काही प्रकरणांच्या बाबतीत 7 व्या वेतन आयोगाच्या निवृत्ती वेतन निश्चिती आदेशावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

3. नियम 80 नुसार ज्याचे निवृत्तीवेतन विवाहा नंतर वा पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे, त्यांचेकडून नमुना नं.एपीपी 14 मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यात येवुन ते माहे डिसेंबर व जुन मध्ये देय होणाऱ्या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र प्राप्त न करता निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यात आले आहे.

4. नियम 93(3) नुसार निवृत्तीवेतन धारकाचा मृत्यु झाल्यास निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या प्रदानानंतर निवृत्तीवेन प्रदान आदेशाचे दोन्ही भाग संवितरण अधिकाऱ्याने निवृत्त वेतन धारकाच्या मृत्युच्या माहितीसह मुख्य लेखा व वित्त अधिका-याकडे परत केले पाहिजे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5. नियम 116 नुसार सात वर्षे सेवा होण्यापुर्वी सेवेत असताना मृत्यृ झाल्यास आणि वयाची 65 वर्ष पुर्ण झाल्यानंतर एखादया निवृत्ती वेतन धारकाचा मृत्यृ झाल्यास त्यांच्या कुंटुंबीयांना मुळ दराने कुटुंब निवृत्तीवेतन दिले जाते परंतु ए.पी.पी.-9 व ए.पी.पी.-10 मध्ये परीपुर्ण रकान्यात परीपुर्ण माहीती भरलेली नसल्यामुळे जादा निवृती वेतन प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4.112 शिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतना बाबत अनियमितता बाबत.

पंचायत समिती सुरगाणा, जिल्हा नाशिक सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 11)

पंचायत समिती सुरगाणा सन 2021-22 चे लेखापरीक्षणात शिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतनाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. नमुना नंबर 9 व 10 एपीपी नोंदवही ठेवलेली नाही

2. पी.पी.ओ. मध्ये 7 व्या वेतन आयोगानुसार देय फरकाच्या हप्त्यांची नोंद केलेली नाही व 7 व्या वेतन आयोगानुसार फेर निवृत्ती वेतन निश्चीत केलेल्या आदेशाच्या प्रती लेखा परीक्षणास आढळुन आलेल्या नाहीत त्यामुळे प्रदान निवृत्ती वेतन व मंजुर निवृती वेतन यांची पडताळणी करता आली नाही.

3. नियम 80 नुसार ज्याचे निवृत्तीवेतन विवाहा नंतर वा पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांचेकडून नमुना नंबर ए.पी.पी.-14 मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यात येवुन ते माहे डिसेंबर व जुन मध्ये देय होणाऱ्या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडणे आवश्यक असताना तसे प्रमाणपत्र प्राप्त न करता निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यात आले आहे.

4. नियम 93(3) नुसार निवृत्तीवेतन धारकाचा मृत्यु झाल्यास निवृत्तीवेतनाच्या थकबाकीच्या प्रदानानंतर निवृत्तीवेन प्रदान आदेशाचे दोन्ही भाग संवितरण अधिका-याने निवृत्त वेतन धारकाच्या मृत्युच्या माहितीसह मुख्य लेखा व वित्त अधिका-याकडे परत केले पाहिजे. तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5. नियम 116 नुसार सात वर्षे सेवा होण्यापुर्वी सेवेत असतांना मृत्यू झाल्यास आणी वयाची 65 वर्ष पुर्ण झाल्यानंतर एखादया निवृत्ती वेतन धारकाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना मुळ दराने कुटुंब निवृत्ती वेतन दिले जाते परंतु ए.पी.पी.-9 मध्ये परीपुर्ण रकान्यात परीपुर्ण माहीती भरलेली नसल्यामुळे प्रदान निवृत्ती वेतनाबाबत लेखा परीक्षणास स्पष्ट अभिप्राय नोंदविता आले नाही.

4.113 निवृत्ती वेतन नोंदवहीतील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती पेठ, जिल्हा नाशिक सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती पेठ जिल्हा नाशिक सन 2021-22 चे लेखापरीक्षणात निवृत्ती वेतन नोंदवहीतील अनियमितते बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे अपेंडीक्स 4,नियम 64नुसार फॉर्म ए.पी.पी.9 निवृत्ती वेतन नोंदवहीत विहीत रकान्यात मंजुर निवृत्ती वेतन, आदेश क्रमांक, दिनांक, अशंराशीकरण रक्कम व प्रदान दिनांक, कुटुंब निवृत्ती वेतनाचे मंजुरीचे आदेश, रक्कम इत्यादी तपशिल नमुद नाही.

2. निवृत्ती वेतन धारकांच्या हयाती बाबत वार्षिक पडताळणीच्या नोंदी निवृत्ती वेतन नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे कुटुंब निवृत्ती वेतन धारकांचे हयात असले बाबतचे दाखले प्राप्त करुन नोंदी घेणेत आल्या नाहीत. त्यामुळे कोणत्या निवृत्ती वेतन धारकांचे हयात निकषा प्रमाणे दाखले प्राप्त आहे किंवा कसे ते पडताळणी करता आली नाही. त्यामुळे अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. खालील निवृत्ती धारकांचे हयातीचे दाखले अद्याप प्राप्त झालेली नाही.

3. ज्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन घेऊन पंधरा वर्ष पूर्ण झालेली आहेत, अशा कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन देयकात अंशराशीकृत निवृत्तीवेतन दिलेले आहे. परंतु नोंदवहीला कुठलीही नोंद नाही. त्यामुळे सदर व्यक्तीला निवृत्ती वेतन घेऊन 15 वर्ष पुर्ण झालेली आहेत किंवा नाही, याची पडताळणी करता आली नाही

4. पंचायतीने ए.पी.पी.9 निवृत्ती वेतन नोंदवहीत मासिक निवृत्ती वेतनाच्या नोंदी, रिव्हाईज पेंन्शनच्या नोंदी, (4 था, 5 वा, व 6 वा वेतन आयोगाच्या नोंदी) इत्याही आढळुन आलेल्या नाहीत.

4.114 दिर्घ सुटीच्या कालावधीत केंद्र प्रमुख व प्राथमिक शिक्षक यांना वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता नियमबाहय़ प्रदानाबाबत.

पंचायत समिती शहादा, जिल्हा नंदुरबार, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक वाहभ-1099/प्र.क्र.45/सेवा-5, दिनांक 09/05/2023 मधील मुद्दा क्रमांक 5(1) व आदिवासी विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आस्था-1097/प्र.क्र.18/का-15 दिनांक 15/11/1997 अन्वये दिर्घ सुटीचा कालावधी 30 दिवसापेक्षा जास्त असेल तर वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय होत नाही.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना दिनांक 1 मे 2021 ते 15 जुन 2021 या कालावधीत उन्हाळी सुटी असताना नियमबाहयरित्या रक्कम रुपये 14,51,173/- वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता प्रदान केला आहे. सदर रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

4.115 दिर्घ सुटीच्या कालावधीत केंद्र प्रमुख व प्राथमिक शिक्षक यांना प्रोत्साहन भत्ता नियमबाहय प्रदानाबाबत.

पंचायत समिती तळोदा, जिल्हा नंदुरबार, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वाहभ-1099/प्र.क्र.45/सेवा-5, दिनांक 09/05/2023 मधील मुद्दा क्रमांक 5(1) व आदिवासी विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आस्था-1097/प्र.क्र.18/का15, दिनांक 15/11/1997 अन्वये दिर्घ सुट्टीचा कालावधी 30 दिवसापेक्षा जास्त असेल तर वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय होत नाही.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना दिनांक 1 मे 2021 ते जुन 2021 या कालावधीत उन्हाळी सुट्टी असताना नियमबाहय रक्कम रुपये 6,63,097/- वाहतुक भत्ता व प्रोत्साहन भत्ता प्रदान केला आहे. सदर रक्कम रुपये 6,63,097/- वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

4.116 शिक्षक कर्मचारी यांना रजा मंजूर नसताना केलेल्या वेतन प्रदानाबाबत.

पंचायत समिती पारनेर, जिल्हा अहिल्यानगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 13)

प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची रजा मंजूर नसतानाही वेतन घेतल्याने शासनाचे रुपये 2,65,181/- चे नुकसान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जि. प. प्राथमिक शाळा, दहावा मैल मधील एक प्राथमिक शिक्षक दिनांक 21 सप्टेंबर 2021 ते 29 ऑक्टोबर 2021 या कालावधीत रजेवर असून त्यांची रजा मंजूर केलेली नसतानाही तसेच सेवापुस्तकात रजेची कोणतीही नोंद न घेता त्यांना माहे सप्टेंबर 2021 चे वेतन रुपये 26,842/- तसेच माहे ऑक्टोबर 2021 चे वेतन रुपये 82,526/- असे एकूण रुपये 1,09,368/- नियमबाह्य प्रदान झाले आहे.

2. जि. प. प्राथमिक शाळा, चोभुत मधील एक प्राथमिक शिक्षक दिनांक 4 मार्च 2021 ते 29 एप्रिल 2021 या काळात दिर्घ मुदतीच्या रजेवर असून रजा मंजूर नसताना आणि सेवापुस्तकात रजेची नोंद नसताना माहे एप्रिल 2021 चे वेतन रुपये 43,379/- नियमबाह्य प्रदान झाले आहे.

3. जि. प. प्राथमिक शाळा, पवळदरा मधील एक प्राथमिक शिक्षक दिनांक 2 ऑगस्ट 2021 ते 13 सप्टेंबर 2021 या रजेच्या कालावधीत रजा मंजूर नसताना आणि सेवापुस्तकात नोंद नसताना माहे ऑगस्ट 2021 चे वेतन रुपये 77,540/- आणि माहे सप्टेंबर 2021 चे वेतन रुपये 34,894/- असे एकूण रक्कम रुपये 1,12,434/- नियम बाह्य प्रदान केले आहे. तरी सदर प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांकडून प्रदान केलेली नियमबाह्य रक्कम वसूल करून शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

4.117 एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण नसताना वेतनवाढी मंजूर केल्याने झालेल्या जादा प्रदानाबाबत.

पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 20)

पंचायत समिती, श्रीगोंदा येथील शिक्षण विभागातील मुख्याध्यापक/उपाध्यापक सन 2021-22 मध्ये एमएससीआयटी (MS-CIT) परीक्षा उत्तीर्ण नसताना किंवा सूट मिळालेली नसताना वेतनवाढी मंजूर करून कर्मचाऱ्यांना अतिरिक्त वेतन प्रदान झाल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20 जुलै 2002 अन्वये शासकीय गट-अ, ब, व क संवर्गातील कर्मचाऱ्यांना संगणक परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णयांनुसार वयाच्या 50 वर्षापेक्षा जास्त वयाच्या कर्मचाऱ्यांना सदर परीक्षेतून सूट देण्यात आली आहे. त्यानुसार 5 मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक हे संगणक परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात आढळून न आल्याने त्यांना एकूण वेतनवाढीची रक्कम रुपये 5,95,755/- अतिप्रदान झाले आहे. सदर प्रकरणी गट विकास अधिकारी/ गट शिक्षणाधिकारी यांनी अशा इतर प्रकरणांचा शोध घेऊन अतिप्रदानाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 3 चे परिशिष्ट एक मधील नियम 1(1) चा (क) तसेच परिशिष्ट चार मधील भाग-ब, उपविभाग (1) मधील नियम 18 आणि 19 (3) नुसार विविध कार्यालयांचे दरवर्षी अंतर्गत लेखापरीक्षण होणे आवश्यक असताना, तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4.118 उपाध्यापक यांना चुकीच्या वेतनवाढी दिल्याने झालेल्या जादा प्रदानाबाबत.

पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 13)

पंचायत समिती संगमनेर सन 2021-22 चे लेखापरीक्षणात शिक्षण विभागातील उपाध्यापक यांना 7 वा वेतन आयोग वेतन निश्चिती करताना चुकीची वेतनवाढ दिल्यामुळे जादा प्रदान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शिक्षण विभागातील उपाध्यापक केंद्र पिंपरणे यांना 7 वा वेतन आयोग वेतन निश्चिती करताना चुकीची वेतनवाढ दिल्यामुळे 1 जानेवारी 2016 रोजी त्यांचे वेतन रुपये 30,100/-इतके निश्चित झाले असताना, 1 जुलै 2019 पासून त्यांना दरवर्षी चुकीची वेतनवाढ दिली गेली त्यामुळे 28 फेब्रुवारी 2023 पर्यंत त्यांना एकूण रुपये 61,394/- जादा प्रदान झाले आहे.

2. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, 2019 मधील नियम 9 नुसार वेतनवाढ देताना अनुज्ञेय वेतन स्तरातील पुढील सेलमध्येच वाढ देणे आवश्यक असताना, एक वेतनवाढ जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

4.119 उपाध्यापिका यांना चुकीच्या वेतनवाढी दिल्याने झालेल्या जादा प्रदानाबाबत.

पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 14)

पंचायत समिती संगमनेर सन 2021-2022 चे लेखापरीक्षणात शिक्षण विभागातील उपाध्यापिका केंद्र साकूर, यांना 7 वा वेतन आयोग, वेतन निश्चिती करताना चुकीची वेतनवाढ दिल्यामुळे रुपये 31,394/- इतके अतिरिक्त वेतन प्रदान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शिक्षण विभागातील उपाध्यापिका केंद्र साकूर, यांना 1 जानेवारी 2016 रोजी त्यांचे वेतन रुपये 30,100/- इतके निश्चित झाले असताना, 1 जुलै 2021 पासून त्यांना दरवर्षी चुकीची वेतनवाढ दिली गेली त्यामुळे 28 फेब्रुवारी 2023 पर्यंत त्यांना एकूण रुपये 31,394/- जादा प्रदान झाले आहे.

2. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, 2019 मधील नियम 9 नुसार वेतनवाढ देताना अनुज्ञेय वेतन स्तरातील पुढील सेलमध्येच वाढ देणे आवश्यक असताना, एक वेतनवाढ जादा दिली गेली आहे.

4.120 शिक्षण विभागातील शिक्षकांच्या वैद्यकीय देयकाबाबत.

पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)

पंचायत समिती खेड यांचे सन 2021-22 या आर्थिक वर्षातील वैद्यकीय देयकांची तपासणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग, यांचे परिपत्रक क्रमांक वैखप्र-2021/प्र.क्र.73/2021/(क्षेप्र) दिनांक 28/06/2021 नुसार वैद्यकीय देयकातील नादेय बाबीवरील खर्च सदर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयकात पी.पी.ई. किट, Sirgical Disposable, Surgical Consumables या बाबींवर कर्मचाऱ्यांना जादा अदा झालेली रक्कम रुपये 86,121/- अंतीम अमान्य केली आहे.

4.121 वैद्यकीय देयकामधील अनियमिततताबाबत.

पंचायत समिती जावळी, जिल्हा सातारा, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

पंचायत समिती जावळी यांनी सन 2021-22 मध्ये शिक्षण विभागाकडील श्रीमती स्वाती रमेश कळसकर, उपशिक्षिका केंद्र कुडाळ, शाळा कुडाळ यांना त्यांच्या सासुच्या कोवीड 19 या उपचारावरील खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम रुपये 2,34,560/- अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. श्रीमती स्वाती कळसकर उपशिक्षिका यांचे सेवापुस्तकातील नमुना 3 मधील मुळ कुटुंब तपशिल प्रपत्र पाहता त्यामध्ये पती व मुलगी या दोघांचा समावेश आहे. सदर प्रपत्रावर नोंद केलेचा दिनांक नाही. मात्र तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांची दिनांकीत स्वाक्षरी 15/11/2016 अशी आहे. या प्रतिपुर्ती देयकाच्या कालावधी दरम्यान नामनिर्देशन प्रपत्रामधील बदल करण्याबाबत व पदस्थापनेची नोंद करण्याबाबतच्या अर्जासोबत इतर प्रपत्रा समवेत कुटुंबाचा तपशिल बदलुन नमुना 3 मध्ये नवीन प्रपत्र जोडले आहे. यामध्ये उपरोक्त दोन नावासोबत मुलगा मोहित, सासरे प्रमोद तसेच सासु शोभा यांची नावे समाविष्ठ केली आहेत. अर्जाचा दिनांक 07/01/2021 नमुद आहे. मात्र सदर अर्ज प्राप्त झालेबाबत आवक क्रमांक व दिनांक नोंदलेला नाही. तसेच या अर्जावर कार्यवाही करणेबाबत संबंधित अधिकारी यांचा शेरा व स्वाक्षरी नाही. सबब नमुद दिनांकास अर्ज कार्यालयास प्राप्त झाला नसताना त्या अर्जानुसार केलेली कार्यवाही नियमबाह्य आहे.

2. सदर नमुना क्रमांक 3 प्रपत्रावर दिनांक 07/01/2021 नमुद केला आहे. मात्र गट शिक्षणाधिकारी कार्यालयाकडील माहिती नुसार सदरची नोंद साक्षांकित केलेल्या अधिकारी श्रीमती अरुणा र. यादव या असुन त्यांची स्वाक्षरी दिनांकीत नाही. तथापि कार्यालयीन कार्यभार कागदपत्रानुसार श्रीमती यादव या गट शिक्षणाधिकारी पदी दिनांक 08/08/2021 रोजी रुजु झाल्या आहेत. म्हणजे ही स्वाक्षरी कार्यभार घेतल्यानंतरची आहे. सबब सदरचा अर्ज व प्रपत्र दिनांक 07/01/2021 रोजी सादर केले नसुन दिनांक 08/08/2021 नंतर सादर केल्याचे दिसुन येते.

3. श्रीमती कळसकर यांच्या सेवापुस्तकातील पृष्ठक्रमांक 19 नोंदीनुसार त्यांच्या सासु श्रीमती शोभा या शासकीय/निमशासकीय सेवेत नसुन उत्पन्नाचे कोणतेही दुसरे साधन नसुन पालन पोषण व औषधोपचाराचा

खर्च स्वाती रमेश कळसकर या करीत असुन त्या त्यांच्यावर अवलंबुन आहेत असे नमुद आहे. या नोंदीवर तत्कालीन प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांची दिनांकीत स्वाक्षरी दिनांक 24/05/2021 अशी आहे म्हणजेच उपरोक्त सदरच्या नोंदी प्रतिपुर्ती लाभाच्या हेतुने पुर्वलक्षी प्रभावाने उपचार पश्चात घेतल्याचे निष्पन्न होते.

4. प्रमाणकासोबतच्या देयकातील नस्तीमधील पृष्ठक्रमांक 159 नुसार वैद्यकीय देयक अदा न केलेबाबतचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सातारा कडील अधिकारी यांचे प्रमाणपत्रानुसार स्वाती यांचे पती गणेश प्रमोद बारटक्के हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे शाखाधिकारी पदावर कार्यरत असुन सदरबाबत त्यांना कोणताही आर्थिक लाभ दिला नसल्याचे नमुद आहे. या नोंदीनुसार त्यांचे पती नोकरीस आहेत. सबब सेवापुस्तकात नमुद केल्याप्रमाणे सासू पुर्णत: त्यांच्यावर अवलंबून नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त अनियमितता पाहता उपचाराच्या दिनांकास सदरच्या रुग्णाचे नाव रक्कम प्रतिपुर्ती केलेल्या कर्मचाऱ्याच्या कुटूंब तपशिलामध्ये समाविष्ठ नसुन अवलंबित्व देखील नाही. सबब सदरचे प्रदान नियमबाह्य झालेले असुन लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

4.122 शिक्षण विभागाकडील कर्मचाऱ्यांना रजा कालावधीत नियमबाह्यपणे वाहन भत्ता अदा केल्याबाबत.

पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 6)

शिक्षण विभाग, पंचायत समिती पंढरपूर यांनी सन 2021-22 मध्ये शिक्षण विभागाकडील कर्मचाऱ्यांना रजा कालावधीत नियमबाह्यपणे वाहन भत्ता अदा केला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पंचायत समिती पंढरपूर शिक्षण विभागाकडील सन 2021-22 मध्ये श्री. तानाजी बजरंग ताणगावडे, उपशिक्षक, रणदिवे वस्ती, खर्डी यांना रजा मंजुरी आदेश क्रमांक 747 दिनांक 29/04/2022 व त्याबाबत कार्यालयीन टिप्पणी दिनांक 29/04/2022 रोजीचा असताना सदर कालावधीचे वेतन देयक दिनांक 31/03/2022 रोजी म्हणजेच रजा मंजुरीच्या अगोदर पारित करण्यात आले आहे.

2. त्यांचा भविष्य निर्वाह निधी/डी.सी.पी.एस., गटविमा रक्कम कपात करण्यात आली नाही.

3. सदर देयके मुदतबाह्य असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 45 नुसार पंचायत समितीच्या मान्यतेशिवाय अदा करता येत नाही असे असताना मान्यता घेतल्याशिवाय प्रदान केले आहे.

4. सदरची रक्कम यापूर्वी अदा केली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही. मुळ परिच्छेदातील तपशीलप्रमाणे एकूण 4 कर्मचाऱ्यांचे रजा कालावधी मध्ये वाहन भत्ता रुपये 2,000/-, अपंग भत्ता रुपये 4,000/- देय नसताना अदा केला आहे तसेच रुपये 500/- व्यवसाय कर वसूल केलेला नाही.

4.123 शिक्षण विभागाकडील परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या जमा रकमा शासन लेखाशिर्षाखाली जमा न केलेबाबत.

पंचायत समिती अक्कलकोट, जिल्हा सोलापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती अक्कलकोट यांनी सन 2021-22 मध्ये शिक्षण विभागाकडील परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या जमा रकमा शासन लेखाशिर्षाखाली जमा न केल्यामुळे झालेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/प्र.क्र.181/आस्था-11 दिनांक 21 मे 2010 प्रमाणे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना अंमलात आणली आहे. सदर योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन दरमहा मुळ वेतन आणि महागाई भत्ता या रकमेच्या 10 टक्के इतके मासिक अंशदान रक्कम अंशदान लेखाशिर्ष 8342 वर जमा करणे आवश्यक आहे. परंतु माहे मार्च 2012 ते एप्रिल 2013 या कालावधीतील एकुण रक्कम रुपये 62,69,729/- गट विकास अधिकारी यांचे खात्यावर शिल्लक असल्याचे लेख्यावरुन दिसून येते.

4.124 ई-वर्ग हर्रास जमिनी बाबत.

पंचायत समिती चांदुर बाजार, जिल्हा अमरावती सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 16)

पंचायत समिती चांदुर बाजार यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये पंचायत समितीकडे 19 जमिनी असुन, त्याचे क्षेत्रफळ 46.64 हेक्टर आहे पैकी 6 जमिनीची हर्रासी झाली असून 13 जमीनींचा हर्रास न

झाल्याने जमिनीपासुन मिळणाऱ्या उत्पत्नापासुन पंचायत समितीचे नुकसान झाल्याचे दिसून येते. तसेच हर्रास अंतर्गत रक्कम रुपये 3,50,920/- प्राप्त झालेली आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 288 मधील 11 व्या अनुसुचीतील अनुक्रमांक 1 व 2 नुसार ज्या जमिनी महसुली लेख्यात जिल्हा परिषदेच्या नावाने आहे, त्याची नोंद 7/12 मध्ये करून घेणे आवश्यक आहे परंतु सर्व जमिनीचे 7/12 उपलब्ध झाले नाही.

2. मुळ परिच्छेदाचे तपशिलाप्रमाणे एकूण 13 जमिनीचे हर्रासी झाली नाही तसेच काही जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे विवरणपत्रावरुन दिसुन येते परंतु सदर अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही केलेली नाही.

3. जमिनी हर्रास झालेले हर्रास पट्टी व इतर लेखे दप्तरी उपलब्ध नाही. सबब हर्रास जमा रकमा योग्य प्रकारे विहीत नियमानुसार प्राप्त झाल्याबाबत खात्री होत नाही.

4.125 ई-वर्ग जमीन हर्रासीतुन जमा रकमेचा विनियोग न होणेबाबत.

पंचायत समिती अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 1)

पंचायत समिती अंजनगाव सुर्जी यांचे सन 2021-22 चे लेखापरिक्षणात ठेव नोंदवहीची पडताळणी केली असता मार्च 2022 अखेर पंचायत समितीकडे ई-वर्ग जमीन हर्रासीतुन जमा झालेली रक्कम रुपये 20,61,589/- शिल्लक असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सदर रक्कमेच्या 75 टक्के खर्च हा त्या शाळांच्या विविध कामाकरिता करणे आवश्यक आहे. उपलब्ध नस्तीची तपासणी केली असता 2021-22 अंतर्गत शाळांतर्गत कोणत्याही कामावर खर्च केलेला नाही.

2. ई-वर्ग जमीन हर्रास निधीतून 12 शाळांकडून प्रस्ताव प्राप्त असूनही शाळा दुरुस्तीविषयक खर्च केला नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहून विकास कामे होऊ शकली नाही.

4.126 ई-क्लास जमिन (शाळेकडील सरकारी जमीन) हर्रास बाबत.

पंचायत समिती बार्शीटाकळी, जिल्हा परिषद अकोला सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 17)

शिक्षण विभाग पंचायत समिती बार्शीटाकळी यांचे सन 2021-22 च्या लेखापरीक्षणामध्ये ई-क्लास जमिन हर्रास नस्तीची मागणी करुनही नस्ती तथा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध केली नाही. शिक्षण विभागाने पुरविलेल्या विवरणपत्रानुसार 10 शाळांकडील जमिन हर्रासीपोटी रुपये 1,24,500/- जमा झाली असून 8 शाळांकडील जमिनीचा हर्रास होत नसल्याचे नमूद आहे तर 1 शाळा सदर जमिनीचा वापर मैदान म्हणून करत असल्याचे विवरणपत्रावरुन दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 288 मधील 11 व्या अनुसुचीतील अनुक्रमांक 1 व 2 नुसार ज्या जमिनी महसुली लेख्यात जिल्हा परिषदेच्या नावाने आहे, त्यांची नोंद 7/12 मध्ये करून घेतली असुन सदर 7/12 हा शाळेच्या नावाने नाही. त्यामुळे नोंदी घेवुन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2. ग्राम विकास विभाग शासन, परिपत्रक क्रंमाक जिपज-2013/प्र.क्र.31/परां-9 दिनांक 25 मार्च 2013 नुसार जिल्हा स्थानिक मंडळ जनपथ सभा जिल्हा मंडळाकडील निहीत असलेली सर्व जंगम मालमत्ता जिल्हा परिषदमध्ये निहीत होत असल्याने सर्व स्थावर व जंगम मालमत्तेवर जिल्हा परिषदेमध्ये नोंदी होणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961चे कलम 100 अन्वये हस्तांतरीत झालेल्या योजनेंतर्गत व जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्राम पंचायत यांनी अशा जमिनीच्या नोंदी करून घेण्याची कार्यवाही केली नाही.

3. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, नियम 97 नुसार नमुना 41 मध्ये नोंदवही ठेवली नाही. याबाबत मागणी करूनही 2021-22 चे हर्रासीबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

4. पंचायत समिती अंतर्गत असलेल्या जिल्हा परिषद शाळेकडे असलेली शेतजमिन शिक्षण विभागाची परवानगी न घेता त्याच्या स्तरावर हर्रासी करुन हर्रासीच्या रक्कमा त्याच्याकडेच किंवा ग्रामपंचायतकडे ठेवण्यात येतात व सदर रक्कम जिल्हा परिषद उपकरामध्ये जमा केल्याचे चलन लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

5. पंचायत समितीने किती शाळाची ई-वर्ग जमीन व दान केलेली जमीन आहे याबाबत नोंदवही ठेवली नाही. हर्रासीची रक्कम पंचायत समितीचे लेख्यात जमा केल्याची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

6. जमिनीवरील अतिक्रमण काढुन तसेच पडीक जमिन शेती करीता वापरायोग्य करुन जमिनीपासुन उत्पन्न वाढ करणे आवश्यक आहे. जमिनी हर्रास न केल्याने पंचायत समितीचे नुकसान झाले आहे.

4.127 ई-क्लास व एफ-क्लास जमिन (शाळेकडील सरकारी जमीन) हर्रास न करणेबाबत.

पंचायत समिती पातुर, जिल्हा परिषद अकोला सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)

पंचायत समिती, पातूरचे शिक्षण विभागाचे 2021-2022 या वर्षाचे लेखापरिक्षणात ई-क्लास नस्तीची पडताळणी केली असता एकुण 6 शाळांकडील एकूण 74.38 हेक्टर शेतजमीन हर्रास केली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 288 मधील 11 व्या अनुसुचीतील अनुक्रमांक 1 व 2 नुसार ज्या जमिनी महसुली लेख्यात जिल्हा परिषदेच्या नावाने आहे त्याची नोंद 7/12 मध्ये करून घेण्यात आले असुन सदर 7/12 मध्ये शाळेच्या नावाने नोंदी करणे आवश्यक आहे.

2. ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रंमाक जिपज-2013/प्र.क्र.31/परां-9 दिनांक 25 मार्च 2013 नुसार जिल्हा स्थानिक मंडळ जनपथ सभा जिल्हा मंडळाच्या कडील निहीत असलेली सर्व जंगम मालमत्ता जिल्हा परिषदमध्ये निहीत होत असल्याने सर्व स्थावर व जंगम मालमत्तेवर जिल्हा परिषदेमध्ये नोंदी घेतल्या नाहीत. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 अन्वये हस्तांतरीत झालेल्या योजनेंतर्गत व जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी अशा जमिनीच्या नोंदी करून घेण्याची कार्यवाही केली नाही.

3. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चेनियम 97 नुसार नमुना 41 मध्ये नोंदवही ठेवली नाही. तसेच जिल्हा परिषद शाळेकडे असलेली शेतजमिन शिक्षण विभागाची परवानगी न घेता त्याच्या स्तरावर हर्रासी करुन हर्रासीच्या रक्कमा त्याच्याकडेच किंवा ग्रामपंचायत कडे ठेवण्यात येतात व सदर रक्कम जिल्हा परिषद उपकरामध्ये जमा न करता शाळेकडून खर्च केल्याचे दिसून आले.

4. पंचायत समितीकडे किती शाळाची ई-वर्ग जमीन व दान केलेली जमीन आहे याबाबत नोंदवही ठेवली नसल्याने एकूण किती जमिन आहे व किती जमिनीचा हर्रासी केली याबाबत माहीती उपलब्ध झाली नाही. तसेच हर्रासीची रक्कम पंचायत समितीच्या लेख्यात जमा नसून सदर रक्कम लेख्याबाहेर असल्याचे दिसून येते.

5. अतिक्रमित जमिनीवरील अतिक्रमणे काढून तसेच पडीत जमिन शेतीयोग्य करुन त्यापासून उप्तन्न वाढ करणे आवश्यक आहे.

4.128 जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मधील वेतन देयक प्रदानामधील अनियमितता.

पंचायत समिती वाशिम, जिल्हा परिषद वाशिम, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)

पंचायत समिती वाशिम यांचे सन 2021-22 चे लेखापरिक्षणादरम्यान जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, वाशिम येथील निवडक महिन्याचे वेतन देयकाची पडताळणी केली असता फेब्रुवारी 2022 च्या वेतन देयकामध्ये आढळलेल्या अनियमितताबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. फेब्रुवारी 2022 च्या वेतन देयकामध्ये एका कर्मचाऱ्याच्या वेतनामध्ये रुपये 1,02,473/- Basic Arrears जमा झाल्याचे दिसते, सदरची रक्कम 7 व्या वेतन आयोगाची थकबाकी असल्याचे स्टेटमेंट लेखापरीक्षणास सादर केले, सदर स्टेटमेंट वरुन कर्मचाऱ्याची 7 व्या वेतन आयोगाची थकबाकीची एकुण फरकाची रुपये 1,69,992/- असून सदर फरकाची रक्कम 5 हप्त्यात जुन 2019 ला रुपये 33,998/- जुन 2020 ला रुपये 33,998/- जुन 2021 ला रुपये 33,998/- जुन 2022 ला रुपये 33,998/- जुन 2023 ला रुपये 34,000/- अशा प्रकारे प्रदान करणे आवश्यक होते. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेपुर-2019/प्र.क्र.8/सेवा-9 दि.09/05/2022 नुसार माहे जुन 2022 मध्ये तिसऱ्या हप्त्याचे प्रदान करण्याबाबत सुचना आहेत. (कोविड-19 मुळे राज्याच्या महसुली जमेवर झालेला प्रतिकुल परिणाम विचारात घेवून थकबाकीचे प्रदान एक वर्षाने पुढे ढकलण्यात आले आहे) त्यामुळे सदर फेब्रुवारी 2022 च्या वेतन देयकापर्यंत केवळ दोन हप्त्याचे रुपये 33,998/- + 33,998/- असे एकुण रुपये 67,996/- प्रदान करणे आवश्यक होते. परंतू रक्कम रुपये 1,02,473/- प्रदान केल्याने जादा प्रदानाची रक्कम रुपये 34,477/- (1,02,473 - 67,996) वसुल होणे आवश्यक आहे.

2. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-2015/प्र.क्र.62/वित्त-5 दिनांक 13.06.2017 नुसार जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना (शिक्षकेत्तर) राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागु केली आहे. त्यानुसार डी.सी.पी.एस./एन.पी.एस. धारक कर्मचाऱ्यांच्या वेतनातून 10 टक्के कपात करुन NPS खाती रकमा जमा करणे आवश्यक आहे तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-2019/प्र.क्र.266/सेवा-4 दिनांक 19.08.2019 नुसार शासनाचे अंशदान 14 टक्के केले आहे. त्यानुसार कार्यवाही केल्याचे वेतन देयकावरुन दिसून येत नाही.

4.129 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिवरा येथील ई क्लास जमिनीचा हर्रास न केल्याबाबत.

पंचायत समिती मालेगाव, जिल्हा वाशिम, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 13)

पंचायत समिती मालेगाव अंतर्गत सन 2021-22 या वित्तिय वर्षात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिवरा येथील ई क्लास जमिनीचे हर्रासी करण्यात आली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 128(1) नुसार मालमत्ता संपादन करण्याचा व ती भाडेपट्ट्याने देण्याचा, विकण्याचा किंवा हस्तांतरीत करण्याचा जिल्हा परिषदेला अधिकार आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. परंतू जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिवरा मालकीची 5.67 हेक्टर जमिन असुन सदर जमिन सन 2015-16 ते 2021-22 पर्यंत हर्रास केली नसल्याचे संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक यांनी दिलेल्या पत्रानुसार दिसुन येते. त्यामुळे शाळेचे पर्यायाने जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा, चिवरा यांचे बँक खात्यात दिनांक 31.03.2022 अखेर रुपये 12,33,251/- विनाकारण पडुन आहे. सदर रकमेचा सक्षम प्राधिकाऱ्याकडुन नियमानुसार विनियोग होणे आवश्यक आहे.

4.130 ई-वर्ग जमीनीच्या हर्रासाच्या रकमेतून नियमबाह्यपणे केलेल्या खर्चाबाबत व इतर अनियमितता.

पंचायत समिती आर्णी, जिल्हा यवतमाळ, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 28)

पंचायत समिती आर्णी यांचे सन 2021-22 या वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये शाळा स्तरावरील ई-वर्ग जमीन हर्रासीचे रोखपुस्तक व उपलब्ध अभिलेखे तपासले असता त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पंचायत समितीने किती शाळांची ई वर्ग जमीन हर्रास केली आहे याबाबत नोंदवही ठेवली नाही त्यामुळे एकूण किती जमीन आहे व त्यापैकी किती जमीन हर्रास केली आहे याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांकडे असलेल्या जमीनीबाबत महसुल विभागाचे कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही.

2. पंचायत समिती आर्णी अंतर्गत इचोरा व महाळुंगी शाळेने उपलब्ध करुन दिलेल्या ई-वर्ग जमीन विषयी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई 2010/प्र.क्र.217/प्राशि1 दिनांक 17 जुन 2010 अन्वये प्रत्येक शाळेकरिता शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करुन त्यांना विश्वासात घेवून, आर्थिक व्यवहार शाळेच्या मुख्याध्यापकाने करावा, असे शासनाचे आदेश आहेत. परंतु खर्च करण्यापूर्वी व खर्च झाल्यानंतर नियमाप्रमाणे नियमित ठराव संमत केले नाही.

पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद शाळेकडे असलेली जमीन शिक्षण विभागाची परवानगी न घेता त्यांच्या स्तरावर हर्रासी करुन हर्रासीच्या रकमा त्यांच्याकडेच ठेवण्यात येतात व सदर रक्कम जिल्हा परिषद उपकरामध्ये जमा न घेता शाळेकडून खर्च केल्या जात असल्याचे दिसुन येते.

3. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, इचोरा व महाळुंगी स्तरावरील ई वर्ग जमीनीचे हर्रासाबाबत व त्यातुन केलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणादरम्यान दिनांक 31.03.2022 अखेर इचोरा शाळेचे खाती रक्कम रुपये 10,59,283/- तर महाळुंगी शाळेच्या खाती रक्कम रुपये 1,40,423/- शिल्लक असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 13 व 49 व महाराष्ट जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 130 पोट कलम (2) खंड (त) अन्वये सर्व मिळालेल्या रक्कमा जिल्हा निधीत जमा कराव्यात असे असताना ई-वर्ग जमीन हर्रासाद्वारे प्राप्त रक्कम ही शाळा स्तरावरच जमा करुन त्या खात्यातून खर्च करण्यात येते.

4. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार नमुना 41 मध्ये ई-वर्ग जमिनीच्या अद्यावत नोंदी घेवून सदर नोंदी प्रमाणित करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केली नाही.

5. ई-वर्ग जमिनीच्या हर्रासास मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची मान्यता घेण्यात आली नाही.

4.131 दीर्घ सुट्टी च्या कालावधीत वाहन भत्ता प्रदान करणेबाबत.

पंचायत समिती देऊळगाव राजा, जिल्हा बुलढाणा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 6)

पंचायत समिती देऊळगाव राजाचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कालावधीत शिक्षण

विभागाचे माहे मे 2021 जुन 2021 च्या वेतन देयकाची पडताळणी केली असता प्रमाणक क्रमांक 22, 23 दिनांक 23.06.2021 व प्रमाणक क्रमांक 32 दिनांक 19.07.2021 अन्वये एकूण रक्कम रुपये 3,56,442/- एवढा वाहन भत्ता प्रदान केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वाहभ-2009/प्र.क्र.78/सेवा-5 दिनांक 5 एप्रिल 2010 मधील अट क्रमांक 4 अन्वये दिर्घ सुट्टीचा कालावधी 30 दिवसांपेक्षा जास्त असेल तर वाहतुक भत्ता अनुज्ञेय असणार नाही असे असताना वरील उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत वाहतुक भत्ता प्रदान केला आहे. त्यामुळे सदर परिपत्रकानुसार सुट्टीच्या कालावधीतील प्रदान वाहतुक भत्ता एकत्रित रुपये 3,56,442/- संबंधीतांकडून वसुल करुन चलनाने योग्य लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

4.132 दिर्घ सुट्टीच्या कालवधीत वाहनभत्ता प्रदान करणेबाबत.

पंचायत समिती सिंदखेड राजा, जिल्हा बुलढाणा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)

पंचायत समिती सिंदखेडराजा यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या माहे मे 2021 देय जुन 2021 व माहे जुन 21 देय जूलै 2021 चे वेतन देयकाव्दारे वाहन भत्ता एकूण रक्कम रुपये 2,09,208/- प्रदान केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वाहभ-2009/प्र.क्र.78/सेवा-5 दिनांक 5 एप्रिल 2010 रोजीच्या मधील अट क्रमांक 4 अन्वये दिर्घ सुटीचा कालावधी 30 दिवसांपेक्षा जास्त असेल तर वाहतुक भत्ता अनुज्ञेय असणार नाही. असे असताना उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत वाहतुक भत्ता प्रदान केला आहे. तरी सुट्टीच्या कालावधीतील प्रदान केलेला वाहतुक भत्ता एकत्रित रुपये 2,09,208/- संबंधितांकडून वसुल करून चलनाने योग्य लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

4.133 शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटीबाबत.

पंचायत समिती संग्रामपूर, जिल्हा बुलढाणा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 20)

पंचायत समिती संग्रामपूरचे सन 2021-22 चे लेखापरिक्षणामध्ये शिक्षण विभागातील काही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निवडक सेवापुस्तकांची तपासणी केली असता आढळलेल्या उणिवांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती व अटी व नियम 1981 मधील नियम 35 ते 49 प्रमाणे सेवा अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. मुंबई वित्तीय नियमावली 1959 मधील नियम क्रमांक 52 मधील परिशिष्ट 17 नुसार सेवापुस्तक हे प्रदीर्घ कालावधी पर्यंत जपुन ठेवणे आवश्यक आहे. करीता सर्व सेवापुस्तकाची व्यवस्थित व मजबुत बांधणी करणे गरजेचे आहे.

2. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम 38(1) प्रमाणे कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक बढत्या/डीसीपीएस/वेतनवाढ/जातवैधता प्रमाणपत्र गटविमा योजना, भनिनि, रजा इत्यादी बाबतच्या नोंदी गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीनिशी करुन घेणे आवश्यक आहे. उपरोक्त नियमाचे नियम 45 प्रमाणे सेवापुस्तकाची वार्षिक पडताळणी केल्याबाबत गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरी घेतलेल्या नाही. नामनिर्देशनाच्या प्रती व नोंदी सेवापुस्तकात नाहीत.

3. शासन निर्णय 20/07/2002 नुसार व मुदतवाढ शासन निर्णय दिनांक 05/05/2007 नुसार विहीत मुदतीत परिक्षा पास न केल्यामुळे सौ.लिला प्रभाकर बोबटकर वरिष्ट सहाय्यक रुपये 15,01,796/- सुधीर गणपतराव दाते सहा. अध्यापक रुपये 12,52,957/- श्री. गोपाल भास्कर लव्हाळे यांची रुपये 15,79,572/- श्री.देविदास नागदेव बावस्कर याची रुपये 19,92,675/- असदुल्ला शहा यांची रुपये 16,72,484/- अशा देण्यात आलेल्या वेतनवाढीची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

तसेच शिक्षण विभागाने MSCIT परिक्षा पास झाली अथवा नाही याची खात्री न करता वेतनवाढी दिल्या आहेत. त्यामुळे संबंधित लिपिक, वरिष्ट लिपिक, अधिक्षक यांनी गट शिक्षणाधिकारी यांना याबाबत अवगत न करता वेतनवाढी दिल्या आहेत. त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चीत करुन वसुली करणे आवश्यक आहे.

4. याबाबत नियमानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहेत तसेच इतर कर्मचारी यांच्या सेवापुस्तकात अपूर्ण असलेल्या सर्व नोंदी घेणे आवश्यक आहे.

4.134 रजा प्रवास सवलत देयकामध्ये चुकीचे वय टाकून नियमबाह्य लाभ घेणेबाबत.

पंचायत समिती बुलढाणा, जिल्हा बुलढाणा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 2)

पंचायत समिती बुलढाणाचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये जिल्हा परिषद हायस्कुल मसला बु. येथील सहायक संचालक यांचे आदेश क्रमांक 2186 दिनांक 09/11/2022 नुसार प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद हायस्कुल येथील रजा प्रवास सवलत देयकाचे सन 2013 ते 2016 मध्ये रोख पुस्तक, खर्च प्रमाणके व सेवा पुस्तकांची पडताळणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय क्रमाक रप्रस/1984/प्र.क्र.1841 दिनांक 20 मार्च 1995 नुसार प्रत्येक चार वर्षाच्या गट वर्षामध्ये फक्त एकदा महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास चा लाभ देण्याची तरतुद आहे. त्या अनुषंगाने रजा प्रवास सवलत देयकाची पडताळणी केली असता प्रमाणक क्रमांक 466 दिनांक 10.10.2012 नुसार रुपये 1,40,462/- व प्रमाणक क्रमांक 842 दिनांक 10.12.2012 नुसार रुपये 1,66,320/- अन्वये मसला बु. येथील हायस्कुल अंर्तगत कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलतीचा लाभ दिला आहे.

दोन्ही देयकामध्ये दिनांक 17.08.2012 ते दिनांक 19.11.2013 या केवळ 15 महिन्यांचा कालावधीत देयकांमध्ये अर्शविलेल्या वयामध्ये तफावत दिसुन येत असल्याने सदर रजा प्रवास सवलत उपभोगल्याचा आभास निर्माण करुन आर्थिक लाभासाठी देयक काढले असल्याचे दिसुन येत असल्याने हा खर्च लेखा परीक्षणास मान्य करता येत नाही. उपरोक्त दोन्ही देयकांची रक्कम रुपये 3,06,782/- ची वसुली करणे आवश्यक आहे.

4.135 कार्यरत शिक्षकांचे मासिक वेतन देयकामधुन आयकर रक्कम कपात न करणे व माहे मे व जुन महिन्यात प्रवासभत्ता प्रदान करणेबाबत.

पंचायत समिती कळमेश्वर, जिल्हा नागपूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती कळमेश्वरचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात शिक्षण विभागातील शिक्षकांचे माहे मे 2021, जून 2021 व जानेवारी 2022 चे मासिक वेतन एकुण 3 प्रमाणकान्वये एकूण रक्कम रुपये 4,64,93,403/- प्रदान केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर-1007/प्र.क्र.105/कोषा.प्रशा.-5 दिनांक 22 फेब्रुवारी, 2008 व भारतीय आयकर अधिनियम, 1961 चे कलम 192 नुसार अधिकारी व कर्मचारी यांचे मासिक वेतन देयकामधुन आयकर रक्कम कपात करणे बंधनकारक असताना तशी कार्यवाही केली नाही. तसेच वित्तीय वर्षाच्या शेवटच्या महिन्यात एकत्रित रक्कम कपात केल्याचे निदर्शनास येते.

2. माहे मे 2021 व जुन 2021 या सुट्टीच्या कालावधीमध्ये अनुक्रमे प्रमाणक क्रमांक 113/18.06.2021 व प्रमाणक क्रमांक 163/15.07.2021 अन्वये एकूण 244 शिक्षकांना वेतनामध्ये एकुण रक्कम रुपये 2,12,077/- एवढा वाहतुक भत्ता अनुज्ञेय नसताना प्रदान केला आहे. संबंधित शिक्षकांच्या वेतनातुन सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

4.136 प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पट संख्येच्या आधारावर समायोजन करणेबाबत.

पंचायत समिती कामठी, जिल्हा नागपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 27)

पंचायत समिती कामठीचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये शिक्षण विभागाचे प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षकांची पदे तपासली असता 12 शाळांमध्ये एकूण 155 पटसंख्या आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक पीटीआर-1113/(01/2013)एसएम-4, दिनांक 13 डिसेंबर 2013 अन्वये मुदयांनुसार कार्यवाही केली नाही. शासन निर्णयान्वये ज्या शाळांमध्ये 20 टक्के पेक्षा कमी विद्यार्थी आहेत, अशा शाळेतील विद्यार्थ्यांना नजीकच्या शाळेमध्ये समायोजीत करणे व जिथे नजीकच्या शाळेच्या अंतरामुळे विद्यार्थ्यांचे समायोजन करणे शक्य होत नसल्यास, अशा विद्यार्थांना वाहतुक अनुदान देवून त्या विद्यार्थांना दुसऱ्या शाळेमध्ये समायोजित करणेबाबत निर्देश असताना शाळांची पट संख्या 20 टक्के पेक्षा कमी असून दुसऱ्या शाळेंमध्ये समायोजन केल्याचे दिसुन आले नाही.

4.137 निवृत्ती वेतन तथा कूटूंब निवृत्ती वेतन मधील गंभीर स्वरुपाच्या अपहाराबाबत.

पंचायत समिती पारशिवनी, जिल्हा नागपूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)

पंचायत समिती पारशिवनी यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात निवृत्ती वेतन तथा कुटूंब निवृत्ती वेतन देयकांची तपासणी केली असता एकूण संख्या 174 निवृत्ती वेतन धारक असून प्रमाणक क्रमांक 361 दिनांक 18.10.2021 रुपये 42,92,284/- (माहे सप्टेंबर 2021 देय आक्टोंबर 2021) व प्रमाणक क्रमांक 862 दिनांक 25.03.2022 रुपये 48,50,446/- (माहे फेब्रूवारी 2022 देय मार्च 2022) निवृत्ती वेतन प्रदान केले असून यामध्ये आढळलेल्या गंभीर स्वरुपाच्या अनियिमततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. प्रमाणक क्रमांक 361 मध्ये एकूण 189 निवृत्ती वेतनधारक व कूटूंब निवृत्ती वेतनधारक शिक्षक यांचे देयक पारित केले आहे. परंतू जिल्हा परिषद नागपूर कडून निर्गमित निवृत्ती वेतन प्रदान आदेश (PPO) संख्या मात्र 174 इतकीच आहे.

2. प्रमाणक क्रमांक 361 नूसार एकूण 15 निवृत्ती वेतनधारक व प्रमाणक क्रमांक 862 नूसार एकूण 16 निवृत्ती वेतनधारकांना निवृत्ती वेतनाचे प्रदान करणेत आले असून त्यांचे निवृत्ती वेतन प्रदान आदेश तसेच हयातीचे दाखले नाहीत. अशा निवृत्ती वेतनधारकांना अनुक्रमे रुपये 4,18,088/- व रुपये 4,89,209/- इतक्या रक्कमेचे प्रदान केले आहे. तरी सदरचे रक्कमेचा अपहार झालेचे आढळते. याप्रमाणे इतर महिन्यांचे देयकांमध्येही अशा प्रकारे प्रदान झाले आहे अगर कसे याची प्रशासकीय स्तरावरुन तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. प्रमाणक क्रमांक 862 मध्ये श्री.एम.वाय.भक्ते यांचे नावाचा उल्लेख असून निवृत्ती वेतन काढणेत आले नाही. तसेच श्री.बी.जी.कामडे यांचे निवृत्ती वेतन काढले आहे. परंतू दूसरे बँक खाते क्रमांक 46190100007569 चा देयकामध्ये उल्लेख आहे. परंतू निवृत्ती वेतन काढण्यात आले नाही. तरी एकाच निवृत्ती वेतनधारकाचे दोन स्वतंत्र खाते क्रमांक ठेवण्याचे प्रयोजन समजून येत नाही.

4. काही निवृत्ती वेतन धारकांच्या देयकामधील बँक खाते व हयातीचे दाखल्यामधील बँक खाते मध्ये तफावत आहे. बहूतेक निवृत्ती वेतनधारकांचे निवृत्ती वेतन प्रदान आदेश क्रमांक नाहीत. तसेच काही निवृत्ती वेतन प्रदान आदेश क्रमांक चूकीचे आहेत.

5. उपरोक्त प्रमाणकामध्ये श्री.एस.वाय.पराते यांचे नाव असून त्यांचा मृत्यू दिनांक 13.11.2019 रोजी झाला असून त्यांना दिनांक 14.11.2019 ते 31.03.2022 पर्यंत एकूण रुपये 4,77,958/- तसेच श्री.रामराव धावडे यांचा मृत्यू दिनांक 18.01.2020 रोजी झालेला असून त्यांना दिनांक 19.01.2020 ते 29.03.2022 पर्यंत रुपये 3,50,462/- इतके अतिप्रदान झाले आहे. सदरचे रक्कमेचे वसूली बाबत पंचायत समितीने बँकेला पत्र दिले असून लेखापरीक्षणाचे तारखेपर्यंत वसूली झालेली नाही.

6. सन 2019-20 मध्ये लेखापरीक्षणात परिच्छेद 9 नूसार आक्षेप घेऊनही पंचायत समितीने सदरच्या अपहाराबाबत दखल घेतली नाही.

4.138 बनावट सेवानिवृत्ती वेतनधारकांना 7 व्या वेतन आयोगातील थकबाकी रकमेचा दूसरा हप्ता प्रदानाबाबत.

पंचायत समिती पारशिवनी, जिल्हा नागपूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)

पंचायत समिती पारशिवनी यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात सेवानिवृत्ती वेनधानकांच्या थकबाकी देयकांची तपासणी केली असता प्रमाणक क्रमांक 384, दिनांक 21.10.2021 अन्वये रुपये 24,60,245/- प्रदान केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकी रक्कमेचा दुसऱ्या हप्त्याचे प्रदान 146 निवृत्ती वेतनधारकांना केले आहे. त्यामध्ये निवृत्ती वेतन प्रदान आदेश (PPO) नसलेल्या 8 निवृत्ती वेतनधारकांची नावे समाविष्ट असून त्यांना देण्यात आलेली थकबाकी रक्कम रुपये 1,75,063/- सव्याज वसूल करणे आवश्यक आहे. तसेच अशाप्रकारे थकबाकीच्या पहिल्या हप्त्याची रक्कम प्रदान केली आहे किंवा कसे याची तपासणी करुन उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4.139 रोख पुस्तकातील अनियमितता व निवृत्ती वेतन धारकाची 15 टक्के नक्षल भत्ता थकबाकीची रक्कम वाटप न करणे बाबत.

पंचायत समिती साकोली, जिल्हा भंडारा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)

पंचायत समिती साकोलीचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये शिक्षण विभागातील किरकोळ रोख पुस्तकातील जमा व खर्चाची व धनादेश नोंदवहीची पडताळणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. रोख नोंदवहीत दिनांक 01/04/2021 रोजी रक्कम रुपये 17,594.25 आरंभिची शिल्लक दिसुन आली. सदर रक्कम बँकेकडुन प्राप्त व्याजाची असल्याने शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

2. दिनांक 31/03/2022 ची रोख पुस्तकातील शिल्लक रक्कम रुपये 2,99,460.99 व बँकेत रक्कम रुपये 3,01,886.99 यामध्ये तफावत आहे. शिल्लकेचा गोषवारा काढला नाही. शिल्लक रकमेचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

3. धनादेश क्रमांक 949934 दिनांक 14/12/2021 अन्वये एकुण 48 सेवानिवृत्त शिक्षकांचा नक्षल भत्ता थकबाकी रक्कम रुपये 20,36,247/- प्राप्त केली आहे. सदर रक्कम रुपये 17,62,716/- शिक्षकांचा नक्षल भत्ता थकबाकी रक्कम प्रदान केली आहे. उर्वरित 11 शिक्षकांचे रक्कम रुपये 2,73,531/- लेखापरीक्षण कालावधी पर्यंत प्रदान केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 27 व नियम 50(2) नुसार तीन महिन्याचे आत प्रदान न झालेली रक्कम संबंधीत लेखाशिर्षा खाली चलनाचे जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही.

4. दिनांक 22/03/2022 चे प्रदान रकमेत बी.बी.उईके यांना रक्कम रुपये 25,425/- प्रदान केल्याबाबत खर्च नोंदविला आहे. परंतु प्रमाणकातील विवरणानुसार श्रीमती आशा वधीवे प्रदान करावयाचे नोंद आहे. सदर नावात तफावत असल्याने रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

4.140 कर्मचाऱ्यांचे वेतनातून कपात केलेले जादाचे आयकर परत करणे संबंधीत कोणतीही रक्कम प्राप्त न करता परत करणेबाबत.

पंचायत समिती साकोली, जिल्हा भंडारा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 12)

पंचायत समिती साकोलीचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये शिक्षण विभागातील किरकोळ रोख पुस्तकामध्ये कर्मचाऱ्यांचे जादा आयकर प्रदानाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

कर्मचाऱ्यांचे वेतन देयकात आयकराची रक्कम जादा कपात झाल्यानंतर आयकर रिर्टन फाईल करुन परत करणे आवश्यक होते. पंरतु शिक्षण विभागाने कोणतेही धनादेश प्राप्त न करता रोखपुस्तकाचे पान क्रमांक 72, दिनांक 19/04/2022 प्रमाणकाद्वारे एकूण 5 कर्मचाऱ्यांना एकूण रक्कम रुपये 1,56,690/- आयकर जादा कपात रक्कम बाबत खर्च नोंदविण्यात आला आहे. तरी सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

4.141 शाळेच्या क्रीडांगणावर फ्लड लाईट बसविणे कामातील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती लाखनी, जिल्हा भंडारा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)

पंचायत समिती लाखनी यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात शिक्षण विभागामार्फत क्रिडांगण विकास अनुदान योजना (अनुसुचित जमाती उपयोजना) अंतर्गत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय भंडारा यांचेकडुन फ्लड लाईट बसविणेसाठी रुपये 19,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विहीरगाव, नान्होरी व पिंपळगाव-1 या तीन शाळांना प्रत्येकी रुपये 5,00,000/- अनुदान मिळाले. प्रत्यक्ष मूल्यांकन रुपये 4,99,201/- असतानाही पूर्ण अनुदान देण्यात आल्याने प्रती शाळा रुपये 799/- प्रमाणे एकूण रुपये 2,397/- जादा देयक दिले आहे. तसेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मेंढा/भु येथे मूल्यांकन रु. 3,99,567/- असताना रुपये 4,00,000/- देऊन रुपये 433/- जादा देण्यात आले. अशा प्रकारे चार शाळांकडून एकूण रुपये 2,830/- जादा प्रदान रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2. चार शाळांच्या कामात कॉन्टीजन्सी रक्कम रुपये 65,150.09 व त्यावरील 12 टक्के जीएसटी रुपये 7,818/- मिळून एकूण रुपये 72,968.09 कंत्राटदारास नियमबाह्य दिली असून सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

3. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा.प्रशा.5, दिनांक 28/09/2018 नुसार 2 टक्के टीडीएस बाबत वजावट करुन त्याचा भरणा शासकीय तिजोरीत करणे आवश्यक आहे. सदर चार शाळांनी जीएसटी, टिडीएस 2 टक्के रक्कम रुपये 37,943/- संबंधित कंत्राटदाराच्या प्रदानाच्या बिलातुन कपात केले नाही. सबब रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4. सदर चारही शाळांच्या देयकातून विमा व कामगार कल्याण कराची कपात केली नाही. त्यामुळे रुपये 37,942/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5. प्रत्येक शाळेने रुपये 500/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना रुपये 100/- च्या मुद्रांकावर केल्यामुळे चार शाळांचे प्रत्येकी रुपये 400/- प्रमाणे एकुण रुपये 1,600/- संबंधीतांकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6. फ्लड लाईटची आवश्यक असल्याबाबत उपयोगीता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल सादर केला नाही.

7. प्रशासकिय मान्यता आदेशाची प्रत व शाळांनी संबंधित कंत्राटदाराला दिलेली कार्यादेशाची प्रत उपलब्ध केली नाही.

4.142 जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे कडून प्राप्त अनुदानातून केलेल्या बांधकामाचे अनियमिततेबाबत.

पंचायत समिती, भंडारा, जिल्हा भंडारा सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 26)

पंचायत समिती भंडारा सन 2021-2022 चे लेखा परीक्षणात शिक्षण विभाग, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना क्रीडांगण विकास योजने अंतर्गत प्राप्त अनुदानातुन व्यायामशाळा बांधकाम व साहित्य खरेदीवर एकूण रुपये 28,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सर्व शाळांनी बांधकाम साहित्य खरेदीसाठी दरपत्रके प्रक्रिया केलेली आहे. परंतु त्यासाठी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 01/12/2016 मधील नियमांचे पालन केले नाही.

2. तीन कामाचे साहित्य देयकाची तपासणी केली असता त्यात साहित्याचे रकमेसोबत मजुरीची रक्कम बेरीज (add) करून येणाऱ्या रकमेवर 12 टक्के जीएसटी परिगणित करून प्रदान केल्याची अनियमितता केली आहे. त्यामुळे कंत्राटदारास तीन कामांवर रक्कम रुपये 42,082/- चे झालेले जादा प्रदान वसुल करणे आवश्यक आहे.

3. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा.प्रशा.5, दिनांक 28/09/2018 तसेच आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194(C) नुसार 2 टक्के टीडीएस बाबत वजावट करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. साहित्य पुरवठादाराचे तसचे सर्व कामाचे जीएसटी, टीडीएस व आयकराची एकुण रक्कम रुपये 83,604/- कंत्राटदाराचे देयकातून कपात केली नसल्याने झालेले जादा प्रदान वसुल करणे आवश्यक आहे.

4. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीएसटी-2017/प्र.क्र.155/कराधान-1, दिनांक 19/09/2017 नुसार शासकीय कार्यकंत्राटावर 12 टक्के वस्तु व सेवा कर निश्चित केल्याचे नमुद आहे. परंतु काम क्रमांक 2 मध्ये मुल्यांकनावर 18 टक्के जीएसटी प्रदान केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे 6 टक्के जीएसटी जादा प्रदान केला आहे. जादा प्रदान रुपये 27,420/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

5. विमा संचालनालय यांचे पत्र क्रमांक 2314, दिनांक 31/03/2015 नुसार कंत्राटदाराने शासकीय विमा निधीने निर्गमित केलेले विमापत्र सादर न केल्यास 25 लाखापेक्षा कमी कंत्राटी मुल्याच्या 0.50 टक्के दराने विमा कपात करावा. तसेच ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2009/प्र.क्र.123/पंरा-7/ दिनांक 22/07/2010 अन्वये बांधकामाच्या एकुण मुल्यांकनानुसार एक टक्का उपकर रक्कम वसुल करावी असे असताना देयकातून सदर शासकीय कपाती केलेल्या नाही. सर्व कामाची एकुण विमा रक्कम रुपये 14,000/- व उपकराची रक्कम रुपये 23,134/- संबंधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

6. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि/10/1009/प्र.क्र.309/दिनांक 11/2/2010 व दिनांक 11/5/2015 चे अधिसूचने नूसार गौण खनिजाची रॉयल्टी शासन खाती भरणा करावयाची आहे. सर्व कामांचे मुल्यांकनात रॉयल्टीची रक्कम जमा दर्शविली आहे सदर रक्कम कपात केली नाही. त्यामुळे कामांची एकुण रॉयल्टी रुपये 1,78,694/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4.143 जिल्हा परिषद शाळेच्या क्रिडांगणावर विद्युत व्यवस्था (Flood Light) करणेचे कामातील अनियमितता. पंचायत समिती लाखांदूर, जिल्हा भंडारा, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 1)

पंचायत समिती लाखांदुर यांनी सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद शाळेच्या क्रिडांगणावर विद्युत व्यवस्था(Flood Light) करणेचे 3 कामावर एकूण रक्कम रुपये 15,00,000/- रोख पुस्तकात खर्च नमूद केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जिल्हा परिषद शाळांनी दरपत्रके मागणी केले असून सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 26 नोव्हेंबर, 2014 नूसार ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब केला नाही.

2. जिल्हा परिषद शाळा दहेगाव आणि विरली येथे Flood Light (विद्यूतीकरण) ची जाहिरात मराठी साप्ताहिक बेरोजगार संदेश या एकाच साप्ताहिकात प्रसिध्द केली असून सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2, दिनांक 27/09/2018 मधील परिच्छेद 2(1.1) नूसार जिल्हा स्तरावरील एक मराठी वृत्तपत्र आणि राज्य स्तरावरील एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द केली नाही. तसेच जिल्हा परिषद शाळा बेलाटीने निविदा सूचना प्रकाशित केलेली नाही.

3. जिल्हा परिषद शाळेचे पटांगणावर Flood Light बसविणेचे कामाची किंमत रुपये 5,00,000/- असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2, दिनांक 27/09/2018 मधील परिच्छेद 2.1 नूसार निविदा प्रसिध्दीचा किमान कालावधी 15 दिवस देणे आवश्यक असताना साप्ताहिक बेरोजगार संदेश प्रकाशित दिनांक 26/04/2021 ते दिनांक 02/05/2021 चे साप्ताहिकात प्रसिध्द जाहिर निविदा सूचना मधील अट क्रमांक 1 नूसार फक्त 7 दिवस दिलेले आहेत. शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दिनांक 27/09/2018 मधील परिच्छेद 5 नूसार निविदा संच (दरपत्रके) रुपये 560/- (500 + 12 टक्के वस्तू व सेवा कर) प्रमाणे 9 दरपत्रकांचे (3 शाळा X 3 दरपत्रके) एकूण रुपये 5,040/- वसूल केले नाहीत.

5. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 27/09/2018 मधील परिच्छेद 2.7 नूसार निविदा रक्कम रुपये 5,00,000/- चे 1 टक्के रुपये 5,000/- प्रमाणे 3 शाळांचे इसारा (Earnest Money) रक्कम रुपये 15,000 वसूल केले नाही. तसेच परिच्छेद 2.8 नूसार सुरक्षा ठेव (Security Deposit) निविदा रक्कम रुपये 5,00,000/- चे 2 टक्के रुपये 10,000/- प्रमाणे 3 शाळांचे रुपये 30,000/- वसूल केले नाही.

6. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नूसार कंत्राटदारास अदा रक्कम रुपये 5,00,000/- चे 2 टक्के आयकर रुपये 10,000/- प्रमाणे 3 शाळांचे रुपये 30,000/- कपात न केल्यामूळे शासन महसूलाचे नूकसान झाले आहे.

7. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा.प्रशा.5, दिनांक 28/09/2018, नुसार 2 टक्के टीडीएस रुपये 10,000/- प्रमाणे 3 शाळांचे रुपये 30,000/- कपात केले नाही.

8. विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक विमास/1098/प्र.क्र.28/98/शासन हमी दिनांक 19/08/1998 तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/35, दिनांक 08/05/2002 नुसार कामाचा आणि कामगारांचा विमा रुपये 7,500/- आणि उपकर रुपये 15,000/- वसूल केले नाहीत.

9. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 (सुधारणा महाराष्ट्र शासन राजपत्र, विधी व न्याय विभाग दिनांक 24/04/2015) नूसार कंत्राटदारासोबत कार्यकंत्राट करारनामा रुपये 500/- चे मुद्रांकावर केला नसल्याने रुपये 500/- प्रमाणे 3 शाळांचे रक्कम रुपये 1,500/- शासन महसूलाची हानी झाली आहे.

10. कंत्राटदाराचे बिल फार्म नूसार कॉन्टीजन्सी 4 टक्के रुपये 17,143/- प्रमाणे जिल्हा परिषद शाळा दहेगाव, विरली आणि बेलाटी यांनी एकूण रुपये 51,429/- जादा प्रदान केले आहेत. सदर रक्कम तसचे वरील सर्व रकमा वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4.144 बदली प्रवास भत्ता देयकाचे जादा प्रदाना बाबत. पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया, (परिच्छेद क्रमांक 8)

पंचायत समिती तिरोडा अंतर्गत सन 2021-2022 मध्ये शिक्षण विभागातील बदली प्रवास भत्याचे जादा

प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 03.03.2010 परिच्छेद 2(अ) नुसार महाराष्ट्र नागरी सेवा नियम 2009 अन्वये लागू केलेल्या सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन संरचनेतील मुळ वेतन म्हणजेच वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन विचारात घेवुन परिगणीत करण्याचे निर्देश आहेत. तरी सदर शासन निर्णयानूसार मुळ वेतन व ग्रेड वेतनाचे 50 टक्के नुसार गणना न करता सरसकट एकुण वेतनावर महागाई भत्त्यासह चुकीची गणना करुन रकमचे प्रदान केल्याने 3 शिक्षकांना एकुण रक्कम रुपये 1,61,170/- चे झालेले अतिप्रदान संबंधितांकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

4.145 शिक्षण विभागाचे निवृती वेतन धारकाचे हयातीचे प्रमाणपत्र राजपत्रित अधिकाऱ्याकडून प्रमाणित नसताना नियमबाह्य निवृती वेतन शोधन तथा निवृती वेतन आदेश प्राप्त होताच त्याची नोंद नियम 65 नुसार एपीपी-10 मध्ये पंचायत समिती निहाय सेवानिवृत्ती वेतन प्रदान आदेश नोंदवहीत नोंद घेतलेली नाही व इतर अनियमिततेबाबत.

पंचायत समिती भद्रावती, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती भद्रावती यांनी सन 2021-22 मध्ये 13 प्रमाणकाव्दारे 506 निवृत्ती वेतन धारकांना माहे फेब्रुवारी 2022 पेड इन मार्च 2022 रुपये 1,11,05,605/- निवृत्ती वेतन प्रदान केले आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासहिंता 1968 नियम 72 नुसार, निवृत्ती वेतन धारकाचे विहीत नमुन्यात हयातीचे प्रमाणपत्र घेऊन खात्री करुन निवृत्ती वेतन शोधन करणे आवश्यक आहे. तथापि, अभिलेखे तपासणी केली असता काही निवृत्ती वेतन धारकांचे हयातीचे प्रमाणपत्र विहीत नमुन्यात नसल्याने योग्यतेची खात्री करता आली नाही. शिक्षण विभागाच्या काही निवृत्ती वेतन धारकांचे हयातीचे प्रमाणपत्र राजपत्रित अधिकाऱ्याकडून किंवा बँकेकडून प्रमाणित नसताना नियमबाह्य निवृत्ती वेतन प्रदान केले आहे.

2. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1986 नियम 39 व परिशिष्ट 4 अंतर्गत नियम 57 नुसार, पंचायत समितीने जिल्हा परिषदेकडून (Appendix IV) नमुना App-8/बी मध्ये निवृत्ती वेतन आदेश प्राप्त होताच त्यांची गट विकास अधिकारी यांनी नियम 65 नुसार App-10 मध्ये पंचायत समिती निहाय सेवानिवृत्ती वेतन प्रदान आदेश नोंदवहीत (Register of Pension Payment Order) नोंद घेणे अपेक्षित आहे. तथापि, पंचायत समितीने App-10 नोंदवही ठेवली असली तरी सन 2016 पासून ती अद्ययावत ठेवलेली नाही.

3. निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतन धारकाचे बँक खाते क्रमांकात तफावत असून पंचायत समितीने या तफावती बाबत हयातीच्या प्रमाणपत्रानुसार खात्री करणे आवश्यक आहे.

4.146 सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक आदिवासी शिष्यवृत्तीमधील अनियमितता बाबत.

पंचायत समिती भद्रावती, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 11)

पंचायत समिती भद्रावती यांनी सन 2021-22 मध्ये सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक आदिवासी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत 1 ते 10 वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना रक्कम रुपये 42,87,000/- शिष्यवृत्तीचे वाटप केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक आदिवासी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांमार्फत शिष्यवृत्ती वाटप केली असल्याचे नमुद आहे. परंतु वितरीत केल्याच्या पावत्या व खर्च अहवाल सादर केला नसल्याने तसेच विद्यार्थ्यांना वाटप केल्याचा बँकेचा RTGS चा अहवाल तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाल्याचा अहवाल घेतला नाही. त्यामुळे शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाल्याची खात्री होत नाही.

2. सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक आदिवासी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यासाठी शाळांनी देण्यात आलेल्या लाभासंबंधी उपयोगिता प्रमाणपत्र मुख्याध्यापकाकडून प्राप्त केले नाही.

3. सन 2020-21 मधील शिष्यवृत्ती रुपये 42,87,000/- पैकी काही रक्कम काही शाळांनी अखर्चित ठेवली आहे.

4. सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती प्रस्ताव वेळेत देणे सदर शाळेची जबाबदारी होती परंतू याप्रकारे वेळेत प्रस्ताव सादर न केल्याने संबंधीत शाळेतील पात्र विद्यार्थ्यी शिष्यवृत्ती पासून वंचीत राहीले आहेत.

4.147 सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजने अंतर्गत जिल्हा परिषद शाळांना अनुदान वाटपाबाबत. पंचायत समिती वरोरा, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 18)

पंचायत समिती वरोरा यांनी सन 2021-22 मध्ये आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक 17 एप्रिल 2018 अन्वये राज्यातील 1 ली ते 10 वी पर्यंतच्या अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांकरिता सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यासाठी एकुण रक्कम रूपये 1,22,78,000/- शाळांच्या बँक खात्यावर वर्ग केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थ्यांच्या किंवा पालकांच्या संयुक्त आधार संलग्न बँक खात्यात जमा केल्याची यादी लेखापरीक्षणास सादर केली नसल्याने शिष्यवृत्ती थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केल्याची व मंजुर यादीतील लाभार्थी पात्र असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

2. पात्र विद्यार्थी हे अनूसूचित जमातीचेच असल्याबाबत जातीचे प्रमाणपत्र नस्तीत उपलब्ध नाही.

3. शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यी/पालकांच्या संयुक्त आधार संलग्न बँक खात्यावर दोन हफ्ते म्हणजे पहिला हफ्ता (50 टक्के) व दुसरा हफ्ता (50 टक्के) देणे अपेक्षीत असताना संपूर्ण रक्कम एकत्रित देण्यात आली आहे. त्यामुळे शासन निर्णयानूसार कार्यवाही केलेली नाही.

4. शासन निर्णयानूसार पंचायत समिती शिक्षण विभागामार्फत शिष्यवृत्ती वाटपाची स्वतंत्र, प्रमाणित व अद्ययावत नोंदवही ठेवली नाही.

5. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर करायचा कार्यपुर्ती अहवाल लेखापरीक्षणास सादर केले नाही. तसेच एकत्रित गोषवारा प्रपत्र ब व मुख्याध्यापकांकडुन प्राप्त झालेले प्रस्ताव नस्तीबद्ध केले नाही.

6. काही शाळांमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थांच्या खात्यात जमा न करता धनादेशाव्दारे प्रदान केली आहे.

4.148 शिक्षण विभागाअतंर्गत सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ वेळेत न देणेबाबत. पंचायत समिती सावली, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

पंचायत समिती सावली यांनी सन 2021-22 मध्ये सन 2020-21 करिता एकुण 1748 विद्यार्थ्यांना रुपये 25,13,500/- तसेच सन 2021-22 मध्ये एकुण 104 शाळेतील 1746 विद्यार्थ्यांना रुपये 24,61,500/- अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. आदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक शिष्यवृ-2017/प्र.क्र.134/का-12 दिनांक 17/04/2018 नुसार 1 ली ते 10 वीतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेचा निधी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करणे अपेक्षित असताना शाळा स्तरावरून RTGS ऐवजी धनादेशाद्वारे वितरित केला आहे.

3. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), यांचे अनुदान वाटप आदेश पत्र क्रमांक 972, दिनांक 15.03.2022 अन्वये राष्ट्रीयकृत बँकेमार्फत रक्कम शाळेच्या मुख्याध्यापकांचे खात्यात RTGS व्दारे जमा करण्यात यावी व बँकेकडून अहवाल प्राप्त करुन घेणे बाबतचे निर्देश असताना पंचायत समितीने सदर शाळेच्या बँक खत्याची तपासणी न करता इतर बँक खात्यात रक्कम जमा केल्याचे दिसून येते.

4. आदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक शिष्यवृ-2017/प्र.क्र.134/का-12, दिनांक 17/04/2018 नूसार शिष्यवृत्तीची देय रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या संयुक्त आधार संलग्न बँक खात्यावर दोन हप्त्यात बँक खात्यात रक्कम जमा करणे आवश्यक असताना दुसरा हप्ताउशीराने जमा केल्याचे दिसुन येते.

5. शिक्षण विभागा मार्फत शिष्यवृत्ती वाटपाची स्वतंत्र, प्रमाणित व अद्ययावत नोंदवही ठेवलेली नाही.

4.149 शिक्षकेत्तर व शिक्षक निवृत्ती वेतन धारकाचे निवृत्ती वेतन प्रदान प्रक्रीयेतील अनियमितता. पंचायत समिती सावली, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 5)

पंचायत समिती सावलीचे सन 2021-22 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये सेवानिवृत्ती वेतन प्रदानाबाबत तपासणी केली असता पंचायत समितीला प्राप्त अनुदान रुपये 12,56,77,000/- असून रुपये 8,89,14,259/- प्रत्यक्ष खर्च होऊन व रक्कम रुपये 3,67,62,741/- अनुदान शिल्लक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. आर्थिक वर्ष 2021-22 मध्ये शिक्षक व शिक्षकेतर निवृत्ती वेतनाकरिता मागणी व खर्चाची तपासणी केली असता खर्चापेक्षा मागणी 30 टक्यांनी जादा केली आहे. तरी निवृत्ती वेतन अनुदानाची मागणी ही देय असलेल्या निवृत्ती धारक संख्या व रक्कमेला अनुसरून करणे आवश्यक आहे. जादा मागणीमुळे शासनाचा निधी अडकून राहिला आहे.

2. निवृत्ती वेतन अंतर्गत खर्चापेक्षा मागणी जादा केल्याचे आर्थिक वर्ष 2021-22 अखेर रुपये 3,67,62,741/- अनुदान शासनास लेखाशिर्षा निहाय परत न करता एकुण शासकीय निधी अंतर्गत अखर्चित निधी परत केला आहे.

3. नमुना ए.पी.पी.-8(अ) ची तपासणी केली असता निवृत्त कर्मचारी निहाय स्वतंत्र नस्ती जतन केलेली नाही. तसेच सदर नमुना एकत्रित बंधिस्त गठ्ठयात ठेवण्यात आला आहे. सदर नमुना व प्रमाणकाची तपासणी केली असता पंचायत समितीकडे निवृत्ती धारकाचे नमुना ए.पी.पी.8(अ) नसताना त्यांना नियमबाह्य निवृत्ती वेतन दिल्याचे दिसून येते.

4. जानेवारी 2022 च्या निवृत्ती वेतन प्रदानाच्या लेखापरीक्षणात 30 निवृत्त वेतन धारकांचे हयातीचे दाखले प्राप्त न करता विभागाने निवृत्ती वेतनाचे प्रदान केले आहे. निवृत्तीवेतन धारकांने सादर केलेल्या हयातीचे दाखल्यांवर बँक खाते व विभागाने प्रदान केलेले बँक खाते मध्ये तफावत दिसून येते.

5. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 39 नुसार पंचायत समितीने नमुना एपीपी-10 अद्ययावत करण्यात आला नाही.

6. दिनांक 1 नोव्हेंबर रोजी हयात असल्याचे प्रमाणपत्र बँकेकडून/निवृत्ती वेतन धारकाकडून प्राप्त केल्यानंतर त्याची निवृत्ती वेतन आदेश नोंदवही मध्ये नोंद घेण्यात आली नाही.

4.150 सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शिष्यवृत्ती विद्यार्थांच्या खात्यात जमा करणेबाबत. पंचायत समिती कोरपना, जिल्हा चंद्रपूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती कोरपना यांचे सन 2021-22 या वितीय वर्षाचे लेखापरीक्षणात सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमीक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत प्राप्त निधीतून रक्कम रुपये 91,52,500/- शिष्यवृत्ती वाटप केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शिष्यवृत्ती वाटपाची बँकनिहाय यादी लेखापरीक्षणात सादर केली नसल्याने शिष्यवृत्ती रोख स्वरुपात दिली की थेट लाभार्थ्यांच्या वैयक्तिक खात्यात किंवा पालकांच्या संयुक्त आधार संलग्न बँक खात्यात जमा केली तसेच मंजुर यादीतील लाभार्थी लाभ घेण्यास पात्र असल्याबाबतची तपासणी करता आली नाही.

2. पात्र विद्यार्थी हे अनुसूचित जमातीचेच आहेत याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र नस्तीबद्ध नाही.

3. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक शिष्यवृत्ती-2017/प्र.क्र.134/का-12, दिनांक 17 एप्रिल 2018 नुसार शिष्यवृत्तीची देय रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या/पालकांसोबतच्या संयुक्त आधार संलग्न बँक खात्यावर दोन हप्त्यात देणे आवश्यक असताना एकत्रित संपुर्ण रक्कम दिल्याचे दिसून आले. त्यामुळे शासन निर्णयानुसार कार्यवाही झालेली नाही.

4. पंचायत समिती यांच्या शिक्षण विभागा मार्फत शिष्यवृत्ती वाटपाची स्वतंत्र, प्रमाणित व अद्ययावत नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

5. पंचायत समिती कोरपना येथे शाळेच्या लेख्यांची तपासणी केली असता शिक्षण विभागांतर्गत शाळेमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थांच्या खात्यात जमा न करता नियमबाह्यपणे रुपये 86,000/- रोखीने व धनादेशाव्दारे प्रदान केली आहे.

4.151 इयत्ता 1 ली ते 10 वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यासाठी सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीची रक्कम प्रदान करणेबाबत.

पंचायत समिती राजूरा, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 22)

पंचायत समिती राजुरा यांचे सन 2021-22 वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनाचे अभिलेखे तपासले असता योजनेवर रुपये 71,69,500/- खर्च केल्याचे रोकड वहीत आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक 1588, दिनांक 17.05.2021 नुसार आरटीजीएस द्वारे प्राप्त झालेल्या रकमेची पोहोच पावती व उपयोगिता प्रमाणपत्र शिक्षण विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना सादर केल्याबाबतचे दस्तऐवज आढळून आले नाहीत.

2. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक शिष्यवृत्ती-2017/प्र.क्र./134/का-12, दिनांक 17 एप्रिल 2018 अन्वये वाटप केलेल्या शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त झाल्याबाबत विद्यार्थ्यांची व त्याच्या पालकांच्या स्वाक्षरीसह पोहोच पावती पंचायत समितीने प्राप्त केल्याचे आढळून आले नाही.

3. उपरोक्त शासन निर्णयान्वये शिष्यवृत्तीची रक्कम दोनदा सहा-सहा महिन्यांच्या अंतराने 50/50 टक्के वाटप करण्याचे निर्देश असताना एकदाच 100 टक्के बँक खात्यात जमा केल्याचे आढळून आले.

4. सन 2020-21 मध्ये 144 शाळेतील 2719 आणि 2021-22 मध्ये 145 शाळेतील 2619 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्यासाठी आरटीजीएस द्वारे संबंधित मुख्याध्यापक यांना वितरित केली. परंतु त्यांनी संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीची रक्कम कधी वाटप केली याबाबतचा खर्च/ वाटप अहवाल आणि उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही.

5. पात्र विद्यार्थी हे अनुसूचित जमातीचेच असल्याबाबत जातीचे प्रमाणपत्र संलग्न किंवा नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. मुख्याध्यापकांनी तसे प्रमाणित करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही.

4.152 जिल्हा परिषद हायस्कूल, एटापल्ली येथील अखर्चित रक्कमेबाबत.

पंचायत समिती एटापल्ली, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 3)

पंचायत समिती एटापल्ली यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणा दरम्यान जिल्हा परिषद हायस्कूल एटापल्ली चे अभिलेखे तपासले असता रोखपुस्तकात सन 2018-19 पासून रक्कम रुपये 3,30,321.72 अखर्चित असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

वित्त विभाग शासन निर्णय, 6 जुन 2008 आणि शासन परिपत्रक क्रमांक अखनि-2016/प्र.क्र.22/वित्त-2, दिनांक 13 मे 2016 नुसार, प्रत्येक आर्थिक वर्षात शासनाकडून प्राप्त अनुदान प्राप्त झालेल्या वर्षात व त्यापैकी अखर्चित अनुदान लगतच्या पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यास अनुमती असून त्यानंतर अखर्चित असणारे अनुदान शासनास परत करणे बंधनकारक आहे. परंतु जिल्हा परिषद हायस्कूल एटापल्ली येथे आस्थापना निधीतील अखर्चित अनुदान रुपये 3,30,321.72 सन 2018-19 पासून खर्च न करता पडून असल्याचे निदर्शनास आले. तरी सदर अखर्चित अनुदान त्वरित शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

4.153 निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतनाबाबत अनियमितता.

पंचायत समिती सिरोंचा, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)

पंचायत समिती सिरोंचा यांचे सन 2021-22 वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान शिक्षण विभागांतर्गत निवृत्ती वेतनधारकांचे, कुटुंब निवृत्ती वेतनधारकांचे अभिलेखे तपासले असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शिक्षण विभागाने नमुना APP-10 मध्ये देय असलेले निवृत्ती वेतनासंबंधी नोंदी अद्ययावत ठेवल्या नसल्याने प्रत्यक्षात प्रदान केलेल्या रकमांची नोंदवही सोबत पडताळणी करता आली नाही. तसेच नमुना 9 ची नोंदवही विभागाने ठेवलेली नसल्याचे दिसून आले.

2. PPO नमुना 8 अ ची पंचायत समिती निहाय पेंशन लायब्ररी ठेवण्यात आल्याचे दस्तऐवज दिसून आले नाही.

3. निवृत्ती वेतन धारकांची तक्रार नोंदवही, पुनर्संचयित निवृत्ती वेतन (Restoration of pension) किती प्रकरणे आहेत याची नोंदवही, निवृत्ती वेतनातून आयकर कपात नोंदवही मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर न केल्याने सदर नोंदवह्या ठेवण्यात आल्या नाहीत असे दिसून येते.

4. शिक्षण विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रानुसार निवृत्ती वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारकांची एकुण संख्या 121 असुन त्यापैकी 8 कुटुंब निवृत्ती वेतन धारकाचे अद्यापपर्यंत हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. तरी सदर व्यक्तींकडुन किंवा त्यांचे कुटुंबा कडून हयातीचे/ हयात नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करणे व पुढील उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4.154 जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेंच्या अधिनस्त असलेल्या शाळांचे शाळाभाडे प्रदान रक्कमेतील नियमिततेबाबत.

पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 18)

पंचायत समिती बीडचे सन 2021-22 या वर्षाचे लेखापरिक्षणात अधिनस्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळांचे भाडे एकूण रुपये 2,43,69,274/- प्रदान केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(सी) नुसार रक्कम रुपये 30,000/- चे वरिल प्रदान करतेवेळी देयकातुन 2 टक्के दराने आयकर कपात करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना पंचायत समितीने एकूण 28 शाळांचे भाडे रक्कमेवर 2 टक्के आयकर कपात केली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 4,87,385/- संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4.155 शाळा इमारत भाडे प्रदानातील उणीवाबाबत.

पंचायत समिती केज, जिल्हा बीड सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती केजचे सन 2021-22 या वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये गट शिक्षण अधिकारी यांनी रक्कम रुपये 61,74,573/- इतके इमारत भाडे प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पंचायत समिती केजने सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांच्याकडून वाजवी भाडे प्रमाणपत्र इमारत धारकांकडून प्राप्त करून घेतलेले नाही.

2. इमारत धारकाकडून 2.34 दराने प्रदान रक्कमेवर आयकर कपात रक्कम कपात केली नाही. तरी रक्कम रुपये 1,44,485/- आयकर संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3. शिक्षण अधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद बीड, इमारत भाडे ज्यादा प्राप्त अनुदान रुपये 13,28,600/- शासन खाती भरणा करण्यात आले नाही.

4.156 15 वा वित्त आयोग अबंधित (Untide) अनुदान अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी डीजीटल ई-लर्निंग कामातील अनियमितते बाबत.

पंचायत समिती लोहारा, जिल्हा धाराशिव सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 24)

पंचायत समिती लोहाराने सन 2021-22 मध्ये 15 वा वित्त आयोग अबंधित (Untide) अनुदान अंतर्गत मुळ परिच्छेदातील तपशीलाप्रमाणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी डिजीटल ई-लर्निंगच्या एकूण 8 कांमावर रक्कम रुपये 20,62,800/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कामासाठी लागणारे साहित्य हे केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्मेंट ई-मार्केट प्लेस (GeM) या पोर्टलवरील निश्चित केलेल्या कार्यपद्धती नुसार वस्तूंची खरेदी करणे बंधनकारक राहील. परंतु सदरचे साहित्य ई-मार्केट प्लेस (GeM) या पोर्टलवर उपलब्ध नसल्यास त्याची खरेदी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील अटी व शर्ती नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना, दरपत्रके न मागवता साहित्य खरेदी केले आहे. सदर शासन निर्णयानुसार कोणतीही कार्यवाही न झाल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

2. कामाचे ई-लर्निंग साहित्य व टी.व्ही. IEC/ISI च्या प्रमाणे आवश्यक असून N.A.B.L. मान्यताप्राप्त लॅबकडून प्रमाणित करणे तसेच प्रकाशाची चाचणी व सुयोग्यता चाचणी अहवाल व प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना, याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3. विमा संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक प्रविनी-2314/देयक कपात रक्कम/संकिर्ण/अभि-3 दिनांक 13/03/2015 नुसार कामाचा विमा, काम सुरु होण्यापुर्वी उतरविलेला नसल्याने सर्व कामांचे देयकातुन कपात केलेली विमा रुपये 20,628/- तसेच वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 अन्वये कामाच्या देयकातुन सीजीएसटी व एसजीएसटी ची कपात केलेली रक्कम रुपये 25,920/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/प्र.क्र.108/कामगार-7-अ दिनांक 17/06/2010 नुसार देयकातुन कपात केलेली कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये 20,628/- तसेच आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर रक्कम रुपये 41,256/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5. अनुक्रमांक 5, 6, व 7 चे कामाचे खरेदीची उपप्रमाणकानुसार प्रत्येकी रुपये 1,91,700/- होत असताना प्रत्येकी रुपये 1,92,000/- प्रमाणे ग्रामपंचायतीस अदा केल्यामुळे प्रत्येकी रुपये 300/- प्रमाणे तीन कामांचे एकूण रुपये 900/- चे झालेले जादा प्रदान वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6. सर्व खरेदी ही सह्याद्री सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस कडुन केली आहे. परंतु अनुक्रमांक 1 ते 4 प्रत्येक नगामागे रुपये 900/- जादा दर लावल्यामुळे 20 नगांचे रुपये 18,000/- झालेले जादा प्रदान संबंधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

7. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2012/प्र.क्र.467/रस्ते-1 दिनांक 21/11/2011 अन्वये कामाचे आदेश देताना दोष/उणीवा दायित्व कालावधी नमूद केला नाही.

4.157 निवृत्तीवेतन प्रदानाविषयक आवश्यक त्या नोंदवहया अद्यावत नसणेबाबत व निवृत्ती वेतन धारकाच्या 7 व्या वेतन आयोग वेतन निश्चिती मधील चुकीच्या वेतन निश्चितीमुळे झालेल्या जादा अदायीबाबत. पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 27)

पंचायत समिती निलंगाचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये निवृत्तीवेतन प्रदानाविषयक आवश्यक त्या नोंदवहया अद्ययावत नसून व निवृत्ती वेतन धारकाच्या 07 व्या वेतन आयोग वेतन निश्चितीमधील चुकीच्या वेतन निश्चितीमुळे रक्कम रुपये 1,48,25,346/- जादाचे प्रदान झाल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक सेनिवे-1014/प्र.क्र.26/04 दिनांक 09/06/2014, शासन निर्णय दिनांक 24/01/2019 व परिपत्रक क्रमांक सेनिवे-2019/प्र.क्र.59/सेवा-4, दिनांक 30/07/2019 नुसार निवृत्ती वेतनाचे योग्य निर्धारण करणे आवश्यक असताना, गट शिक्षणाधिकाऱ्यांनी वाढीव टक्केवारीचा चुकीचा समावेश करून जादा वेतन अदा केले आहे. त्यामुळे 01/01/2016 पासूनची रुपये 8,95,754/- जादा अदा झालेली रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट 4 चे नियम 76(2) नुसार ए.पी.पी.12 मध्ये निवृत्ती वेतन प्रदानाचे देयक तयार करण्याऐवजी नमुना 26 मध्ये तयार केले आहे.

3. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट 4 चे नियम 85 नुसार प्रत्येक निवृत्ती वेतन प्रदान आदेश नमुना नंबर ए.पी.पी. 8ब मध्ये घेणे आवश्यक आहे. नियम 64 नुसार ए.पी.पी.9 मध्ये निवृत्ती वेतनाचे प्रदान लेखापरिक्षित करण्यात येईल, प्रदानाचा क्रमांक व दिनांक नमुद करण्यात येईल. ए.पी.पी.9 प्रमाणित करण्यात आले नाही.

नियम 65 नुसार ए.पी.पी.10 मध्ये प्रत्येक संवितरण अधिकारी, निवृत्ती वेतन प्रदान आदेशांची नोंदवही ठेवील. नियम 67 नुसार जी निवृत्ती वेतन विशेष शर्तीच्या अधीन आहेत त्यांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.

नियम 89 नुसार नमुना नंबर ए.पी.पी.15 मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. परंतु प्रदानाचा प्रमाणक क्रमांक व दिनांक नमुद करण्यात आलेली नाही.80 नुसार ज्यांचे निवृत्तीवेतन त्यांच्या विवाहानंतर किंवा पुर्नविवाहानंतर बंद होण्याजोगे असले अशा स्त्री निवृत्ती वेतनधारकांकडून नमुना ए.पी.पी.14 मध्ये प्रतिज्ञापत्र दर सहा महिन्यांनी घेणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

*****